**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावासंबंधी**

**सभापती** : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये एक प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. किरण पावसकर, ॲड. अनिल परब यांनी " कोकणातील येऊ घातलेले अणुऊर्जा औष्णिक प्रकल्प त्याचप्रमाणे खनिज प्रकल्प यामुळे होणारे पर्यावरण प्रदूषण, रत्नागिरी जिल्ह्यातील जैतापूर येथील माडवन औष्णिक प्रकल्पाला या पंचक्रोशीतील संपूर्ण जनतेचा असलेला तीव्र विरोध, त्याचप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हा दोडामार्ग तालुक्यातील खनिज प्रकल्प, या प्रकल्पांना जनतेकडून होत असलेला विरोध, या प्रकल्पामुळे मौल्यवान दुर्मिळ वनस्पती नष्ट होणे, मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होणे, वनचर प्राण्यामधील पटेरी वाघ, बिबटे वाघ आणि हत्ती इत्यादी वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात वावर होणे, यातील वाघांची मोठ्या प्रमाणात हत्या होणे, हे सर्व प्रकल्प पश्चिम घाट भागात असणे, या पश्चिम घाटातील केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने बायोड्रायव्हर्सिटी कमिटी नेमून त्यांचे अध्यक्ष श्री. माधवराव गाडगीळी यांची नेमणूक होणे, पश्चिम घाट भागातील पर्यावरणाचा अभ्यास या समितीमार्फत करुन सहा महिन्यात अहवाल केंद्राला सादर करण्याचे आदेश होणे, तोपर्यंत कोकणातील या सर्व प्रकल्पांना स्थगिती देऊन होणाऱ्या जनसुनावण्यांना स्थगिती देण्यात यावी, त्यामुळे कोकणासारख्या निसर्गाने नटलेल्या प्रदेशाचा पर्यावरण व प्रदूषण यातून बचाव करण्याकरिता या सर्व प्रकल्पातून बचाव होणे आवश्यक आहे" या विषयाच्या संदर्भात दिलेला आहे. आज अर्थसंकल्प सादर होणार आहे. दुसरी बाब अशी की, नियम 289 अन्वये माझ्याकडे प्रस्ताव येत असताना तो जर गटप्रमुखांकडून आला तर त्याला शिस्त लागण्याची शक्यता आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने मी असे सांगेन की, उद्या मी दोन तीन मिनिटे हा प्रस्ताव कसा योग्य आहे हे सांगण्यासाठी सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी देईन त्यानंतर मी त्याबाबत निर्णय देईन.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. **पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना उशीराने वेतनश्रेणी लागू करण्याचा भेदभाव संपुष्टात आणण्याबाबतचा विचाराधीन असलेला प्रस्ताव**

**(१) * ३४०२ श्री. रामनाथ मोते, श्री. संजय केळकर, श्री. विनोद तावडे, श्री.दिलीपराव सोनवणे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. वसंतराव खोटरे, श्री.विक्रम काळे, श्री. सतीश चव्हाण, श्री. संजय पाटील, श्री. व्ही.यु. डायगव्हाणे, श्री. जयंत प्र. पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ६० ला दिनांक ८ डिसेंबर, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इतर सर्व प्रवर्गांना नविन वेतनश्रेण्या दिनांक १ जानेवारी, १९९६ पासून लागू करण्यात आलेल्या असल्या तरी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांना त्या दिनांक १ मार्च, २००० पासून लागू केल्यामुळे झ ालेला भेदभाव संपुष्टात आणण्याच्या विचाराधिन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) असल्यास, मा.पिठासीन अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत ठरलेल्या निर्णयावर एक महिन्याच्या आत कारवाई करण्याच्या प्रश्नाची सद्यस्थिती काय आहे ?

(३) तसेच विदर्भ ज्युनिअर कॉलेज टिचर्स असोसिएशनचे अध्यक्ष व सचिवांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक १५ सप्टेंबर, २००८ रोजी किंवा त्या सुमारास शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांच्यामार्फत एक निवेदन देऊन ही बाब लक्षात आणून दिली त्याबाबत काय कारवाई करण्यात आली,

(४) नसल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) नाही.

(२) व (३) व (४) प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, हा प्रश्न सातत्याने या सभागृहामध्ये येत आहे. राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या वेतनश्रेणीच्या अंमलबजावणीच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. त्यांची जी तफावत ठेवलेली आहे ती दूर करण्याच्या संदर्भात सातत्याने आम्ही या ठिकाणी प्रश्न विचारतो. आता शासनाने जे उत्तर दिलेले आहे ते अत्यंत दुर्भाग्यपूर्ण आणि दिशाभूल करणारे आहे. सभापती महोदय, या सभागृहाची आणि सन्माननीय सदस्यांची दिशाभूल करणारे हे उत्तर आहे. या ठिकाणी यासंदर्भात शेवटची चर्चा 3 जूनला चर्चा झाली होती. त्यावेळी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 3402..... श्री. रामनाथ मोते ....

माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले होते की, 15 दिवसाच्या आत आम्ही मंत्रिमंडळापुढे जाऊन यासंदर्भातील निर्णय घेऊ. सन्माननीय विधानसभा अध्यक्ष यांच्या दालनामध्ये माननीय वित्त मंत्री, माननीय शिक्षण मंत्री यांची बैठक झाली आणि त्या ठिकाणी असा निर्णय झाला की, हे द्यावयाचे आहे. फक्त सर्व विभागांची माहिती येणे बाकी होते म्हणून हा विषय प्रलंबित होता. परंतु यासंदर्भात 3 जूनला जे उत्तर दिले त्यामध्ये स्पष्टपणे असे म्हटले होते की, आता सगळी माहिती गोळा झालेली आहे आणि फक्त आदिवासी विकास विभागाची माहिती राहिलेली आहे. ती माहिती आठ दिवसात घेतो आणि पंधरा दिवसामध्ये मंत्रिमंडळासमोर जाऊन आम्ही यासंदर्भात निर्णय घेत आहोत. असे मान्य केलेले असताना अद्याप ती कार्यवाही सुरु आहे असे उत्तर देणे बरोबर नाही. माझे स्पेसिफिक दोन प्रश्न आहेत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3402..... श्री.रामनाथ मोते...

सन्माननीय शिक्षण मंत्र्यांनी आणि त्यांच्या विभागाने हा विषय मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर नेण्यासाठी काय कार्यवाही केली आहे, 15 दिवसाच्या आत करतो असे म्हटले असल्यामुळे अद्याप मंत्रिमंडळासमोर हा प्रस्ताव का नेण्यात आला नाही आणि त्याचे उत्तर यामध्ये का दिले नाही ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, याबाबत कार्यवाही करण्याचे मान्य केले होते. यासंदर्भात विविध विभागाकडून माहिती घेण्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे. त्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे गेलेला आहे. यासंबंधीचा प्रस्ताव लवकरच मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर आणण्याचा प्रयत्न केला जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी अत्यंत चुकीच्या दिशने उत्तर दिले आहे. प्रश्नाच्या भाग तीन मध्ये असे विचारले होते की, "विदर्भ ज्युनिअर कॉलेज टिचर्स असोसिएशनचे अध्यक्ष व सचिवांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दि.15 सप्टेंबर, 2008 रोजी किंवा त्या सुमारास शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांच्यामार्फत एक निवेदन दिले हे खरे आहे काय," या प्रश्नाला 'होय'असे उत्तर दिले आहे. हे जे निवेदन पाठविले आहे त्या निवेदनामध्ये त्यांनी एक गोष्ट आपल्या लक्षात आणन दिलेली आहे. त्या पत्रासोबतच्या सहपत्र 3 मध्ये काय म्हटले आहे ते सांगतो. पीठासीन अधिका-यांच्या विधान भवनातील दालनामध्ये झालेल्या बैठकीचे ते मिनिट्स आहेत. त्यामध्ये माननीय वित्त मंत्री आणि माननीय शिक्षण मंत्री या दोन्ही मंत्र्यांनी ही गोष्ट मान्य केली की, यांच्यावर हा अन्याय झालेला आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी असे म्हटले होते की, पाचव्या वेतन आयोगाच्या वेतन श्रेणीतील त्रुटीबाबतचे प्रस्ताव विचारात घेण्यात येऊ नये असा निर्णय वित्त विभागाने पूर्वीच घेतलेला आहे. तरी सुध्दा सदर मागणी विचारात घेता माननीय शिक्षण मंत्र्यांनी यासंदर्भात एक प्रस्ताव तयार करुन योग्य त्या खर्चासह प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर आणावा, त्रिस्तरीय वेतनश्रेणी दि.1.1.96 पासून लागू केल्यास शासनावर एकूण किती भार पडू शकेल, याबाबत दोन्ही मंत्रिमहोदयांचे एकमत झाले. सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, राज्य कोण चालवित आहे ? त्या बैठकीध्ये असेही ठरविले होते की, एकत्रित माहिती घेऊन शिक्षण मंत्र्यांनी मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करावा. ही बैठक

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दि.2 एप्रिल, 2008 रोजी झाली, त्याला दोन वर्षे झाली आहेत. त्यामुळे एक महिन्याच्या आत याबाबत निर्णय घेण्यात यावा, असे मंत्रिमहोदयांनी त्या बैठकीत कबुल केलेले आहे. पुढील शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी निर्णय घेण्यात यावा असे त्या मिनिट्समध्ये नमूद केलेले आहे. त्या कार्यवृत्तामध्ये असे आहे, ही गोष्ट खरी आहे काय, पीठासीन अधिका-यांच्या बैठकीत हे ठरले असल्यामुळे माननीय वित्त मंत्री आणि माननीय शिक्षण मंत्र्यांनी हे मान्य केले असले तरी याबाबत अक्षम्य विलंब झालेला आहे त्यामुळे पुढील आठवडयामध्ये याबाबत निर्णय घेऊन सभागृहासमोर त्याची माहिती ठेवली जाईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय पीठासीन अधिकाऱ्यांच्या दालनात याबाबतची सर्व चर्चा झालेली आहे. त्या बैठकीत याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे मान्य केले होते. परंतु हा प्रस्ताव सादर करण्याचे मान्य करीत असातना विविध विभागाची माहिती एकत्रितपणे संकलित करुन मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करावयाचा होता. ही सर्व माहिती संकलित करण्यासाठी वेळ लागला.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदय चुकीची माहिती देत आहेत.

श्री.बाळासाहेब थोरात : याबाबतची माहिती संकलित केलेली आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, त्यावेळी झालेले निर्णय कार्यवृत्तामध्ये आहेत, हा प्रेमाचा निरोप नाही. विभागाच्या एका अवर सचिवांनी असा प्रश्न उपस्थित केला आहे की, हे बहुसंख्य शिक्षक आहेत....

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय मंत्रिमहोदयांचे प्रथम उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदय चुकीचे उत्तर देत असल्यामुळे खाली बसले आहेत.

**सभापती** : आपण बोलत असल्यामुळे ते खाली बसले आहेत.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3402.....

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख हे ज्येष्ठ सदस्य उभे आहेत आणि त्यांचा आग्रह असल्यामुळे मी खाली बसलो होतो. सभापती महोदय, मी मघाशी सांगितल्याप्रमाणे यासंदर्भात विविध विभागाची माहिती संकलित करावयाची होती, ही सर्व माहिती संकलित झालेली आहे. विभागाने प्रस्ताव तयार केलेला आहे, तो प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविलेला आहे, तो प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर लवकर आणण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सभागृहात कशाचे कौतुक सुरु आहे, कार्यवृत्तामध्ये....

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय पीठासीन अधिका-यांच्या दालनात झालेल्या बैठकीच्या वेळी मी स्वत: उपस्थित होतो. कनिष्ठ महाविद्यालये अनेक विभागांमध्ये आहेत. शालेय शिक्षण विभागामध्ये आहेत, आदिवासी विभागामध्ये आहेत. या सगळ्या महाविद्यालयांना एकत्रितपणे किती पैसे लागतील याचा आढावा घेऊन प्रस्ताव सादर करावा असे ठरले होते.

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बैठकीच्या मिनिटस् प्रमाणे 110 कोटी रुपये लागतील असा प्रस्ताव सादर झाला होता. त्यानंतर अर्थमंत्र्यांची बैठक झाली. त्या बैठकीला मी उपस्थित होतो . 110 कोटी रुपये लागतील म्हणून आम्ही दोन पावले मागे सरकलो आणि मानीव दिनांक निश्चित करुन वेतन निश्चिती करावी असे सांगितले आणि त्याप्रमाणे फाईल सादर करुन सहा महिने झाले. आता शासनाचे सातत्याने हे एकच उत्तर आम्ही ऐकत आहोत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी याविषयी मंत्रिमंडळापुढे जाऊन माननीय शिक्षण मंत्री धोरणात्मक निर्णय घेतील काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 115 कोटीचा बोजा होता. मानीव दिनांक निश्चित करुन वेतन निश्चित करावे असा पर्याय दिला होता. त्यासाठी 60 कोटी लागत असले तरी पुढे दरवर्षी खर्च वाढेल, अशा सर्व गोष्टी आहेत.आम्ही दोन पर्याय घेऊन कॅबिनेट समोर जात आहोत. याबाबतीत आम्ही लवकरात लवकर निर्णय घेऊ.

डॉ. वसंत पवार : कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा हा फार महत्वाचा प्रश्न आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील जे शिक्षक तासिका बेसिसवर काम करतात त्यांचे तासिकेचे दर वाढविणार आहात काय ? त्यांचा वर्कलोड वाढणार आहे. आर्टस् किंवा कॉमर्सची एकच तुकडी राहाणार आहे, दोन-दोन तुकडया होणार नाहीत. हे शिक्षक 15-15 वर्षे तासिका बेसिसवर काम करीत आहेत. त्यांच्यासाठी काही योजना आखली आहे काय ? त्यांना क्लस्टरमध्ये आणण्याचा प्रयत्न करणार आहात काय ? तसेच त्यांचे तासिकेचे दर वाढविणार आहात काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्यांनी जी कल्पना मांडली त्याचा विचार केला जाईल.

प्रा. बी.टी.देशमुख : माननीय मंत्री महोदयांनी सरळ सरळ चुकीचे उत्तर दिलेले आहे म्हणून माझा हरकतीचा मद्दा असा आहे की, पीठासीन अधिका-यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकी विषयी चुकीची माहिती माननीय मंत्री महोदयांना देता येते काय ? बिनचूक माहिती अशी आहे की, एका अवर सचिवाने त्या बैठकीत असे सांगितले की, फक्त शालेय विभागामध्ये ही संख्या मोठी असली तरी इतरही काही विभाग आहेत. त्यावेळचे वित्तमंत्री आता सभागृहामध्ये हजर आहेत. या विषयी चौकशी करुन एक महिन्याच्या आत माहिती द्यावी असे त्यावेळी वित्त मंत्र्यांनी आदेश दिले

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होते. मंत्री महोदयांनी टाईम बाऊण्ड प्रोग्रॅम घ्यावा, एक महिन्याच्या आत निर्णय घ्यावा असे सांगितलेले आहे. येते शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी निर्णय घ्यावा असे 2 सप्रिल 2008च्या बैठकीमध्ये पीठासीन अधिका-यांनी सांगितले. अजून पुढचे शैक्षणिक वर्ष सुरु झालेले नाही काय ? माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, अशा प्रकारे माननीय मंत्री महोदयांना चुकीची माहिती देता येते काय ?

**सभापती** : पीठासीन अधिका-यांच्या दालनामध्ये एप्रिल 2008 मध्ये झालेल्या बैठकीत जो निर्णय झाला असेल त्या बरहुकूम त्या निर्णयाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्याची नोंद घ्यावी.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, दोन वर्षापूर्वी आपल्या दालनामध्ये निर्णय झाला. माननीय मंत्री महोदय सभागृहामध्ये पुन्हा तेच तेच उत्तर देत आहेत. आम्ही कॅबिनेट पुढे जात आहोत असे मंत्री महोदयांनी सांगितले. कॅबिनेटपुढे जाण्यामध्ये कोण अडथळा निर्माण करीत आहे हे माहीत नाही. परंतु या आठवडयामध्ये येणा-या कॅबिनेटमध्ये जाऊन निर्णय करण्यात येणार आहे काय ? सभापती महोदय, ही 5 व्या वेतन आयोगाची थकबाकी आहे, सहाव्या वेतन आयोगाची नाही.

श्री. बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे आदिवासी विकास विभाग, ग्रामविकास विभाग, सामाजिक न्याय विभाग अशा विविध विभागाची माहिती गोळा करावी लागणार होती. वेळेचा प्रश्न होता.

प्रा. बी.टी.देशमुख : एका महिन्यात माहिती द्यावी असे आदेश दिलेले असताना त्यासाठी 2 वर्षे घेतली. सभापती महोदय, आपण निर्णय दिल्यानंतर पुन्हा पुन्हा चुकीची माहिती दिली जात आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत मत / शुद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदय, पीठासीन अधिकाऱ्यांच्या दालनामध्ये जी बैठक 2008 मध्ये झाली त्या बैठकीमध्ये जे काही निर्णय झाले त्यातील एक निर्णय असा होता की, एका महिन्याच्या आत याची पूर्तता करावी आणि कॅबिनेटपुढे जावे. यादृष्टीने जी पूर्तता करावयाची होती ती पुष्कळशी लांबली आहे. या संदर्भात सगळा आशय असा आहे की, लवकरात लवकर या अधिवेशनाच्या दरम्यान या विषयावर निर्णय होऊन तो निर्णय सभागृहात जाहीर केला जाईल काय असा प्रश्न आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, अधिवेशन संपण्यापूर्वी मंत्रीमंडळापुढे जाऊ.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपल्या चांगुलपणाचा फायदा घेऊन दिशाभूल करण्याचा प्रयत्न मंत्रीमहोदय करीत आहेत.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, पीठासीन अधिकाऱ्यांच्या दालनामध्ये झालेल्या ज्या बैठकीचा उल्लेख झाला, त्यानंतर सुध्दा 3 जून, 2009 रोजी हा विषय सभागृहात चर्चेला आला होता. 3 जून, 2009 रोजी उत्तर देत असताना शासनाने सगळी माहिती आली आहे, 15 दिवसात मंत्रीमंडळापुढे जात आहोत असे म्हटले होते. हे अधिवेशन संपण्यापूर्वी कॅबिनेटसमोर जाऊ असे म्हणण्याऐवजी कॅबिनेटसमोर जाऊन निर्णय करुन तो सभागृहात जाहीर केला जाईल का? या प्रश्नाचे प्रारुप अन्य सन्माननीय सदस्यांची नावे जोडल्यामुळे अपेक्षेप्रमाणे आलेले नाही. ज्या सन्माननीय सदस्यांचा प्रश्न ॲडमिट होतो त्यांच्या प्रश्नाप्रमाणे प्रारुप यावे अशी अपेक्षा आहे.

**सभापती** : विधीमंडळ सचिवालय याची नोंद घेईल.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मी पुन्हा सांगतो की, 3 जून, 2009 ला जे उत्तर दिले त्यावेळी आदिवासी विभागाची माहिती येणे बाकी होते. वित्त विभागाकडे संपूर्ण प्रस्ताव सादर केला आहे. मंत्रीमंडळापुढे जावे ही अपेक्षा आहे. अधिवेशन संपण्यापूर्वी मंत्रीमंडळापुढे हा प्रस्ताव नेऊ.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, समाधानकारक असले तरी त्याची कालमर्यादा दिली ती बरोबर नाही. याचे कारण असे की, यापूर्वी दोन वेळा शासनाने सभागृहात अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय केला जाईल असे म्हटले होते. मी ते वक्तव्य वाचून दाखवित नाही. म्हणून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापतींनी मंत्रीमहोदयांना स्पष्ट सांगितल्यानंतर या आठवड्यामध्ये याचा निर्णय करावा आणि पुढील आठवड्यात सभागृहात निवेदन करावे. असे करणार नसाल तर पीठासीन अधिकाऱ्यांसमवेत झालेल्या बैठकीच्या विषयाचा अनादर, सभागृहात दिलेल्या आश्वासनाचा अनादर याचा निषेध करुन आम्ही सभात्याग करु. एका आठवड्यामध्ये निर्णय करावा आणि पुढील आठवड्यात सभागृहात तो निर्णय जाहीर करावा. असे मंत्रीमहोदय करतील काय?

श्री.बाळासाहेब थोरात : वित्त विभाग त्या प्रस्तावाची छाननी करीत आहे. त्यामध्ये वेळ लागणार आहे. त्यामुळे अधिवेशन संपण्याच्या अगोदर.....(अडथळा)....

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

**सभापती** : मंत्रीमहोदयांनी माझ्याकडे बघून उत्तर द्यावे. मंत्रीमहोदय आपल्याला आणखी पुढे काही सांगावयाचे आहे काय?

श्री.बाळासाहेब थोरात : अत्यंत स्पष्टपणे उत्तर देतो की, अधिवेशन संपण्यापूर्वी मंत्रीमंडळापुढे हा विषय निर्णयासाठी आम्ही नेऊ.

प्रा.बी.टी.देशमुख : आम्ही निषेध करतो आणि सभात्याग करतो.

(काही सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात)

---



अशुद्धीरित प्रत / मुद्रणदोषासाठी नाही

**भाईंदर (प.) (जि.ठाणे) येथील उर्दू शाळेमध्ये शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या खिचडीत सापडलेल्या अळ्या**

**(२) * ३३७१ श्री.राजन तेली, श्री. संजय दत्त, श्री.सय्यद ज़मा :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर (प.) (जि.ठाणे) येथील उर्दू शाळा क्र. ३१ मध्ये शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या खिचडीत अळया सापडल्याची घटना दिनांक ४ नोव्हेंबर, २००९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या खिचडीत अळया सापडण्याच्या वारंवार घडत असलेल्या प्रकारांना आळा घालण्याबाबत तसेच अशा प्रकारची खिचडी पुरविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) नाही.

(२) अशा प्रकारची घटना आढळून आली नसली तरी मिरा-भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ शाळा क्र. ३१, (उर्दु) च्या मुख्याध्यापिकेच्या तक्रारीनुसार अन्नाचे नमुने तपासणी करीता पाठविले असता अन्नाचे नमूने P.F.A. १९५५ प्रमाणे चांगले असल्याचे आढळून आले असले तरी सदर तक्रारीचा विचार करुन सदर ठेकेदाराचा ठेका रद्द करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, अन्नाचे नमुने तपासणीसाठी पाठविल्यानंतर ते चांगले आढळून आले आणि ठेकेदाराचा ठेका रद्द करण्यात आला आहे. प्रश्न असा उपस्थित होतो की, अन्नाचे नमुने तपासणीमध्ये चांगले असल्याचे आढळून आले असतील तर ठेकेदाराचा ठेका रद्द का करण्यात आला?

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3371.....

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, एकंदर तक्रारी आल्यानंतर तातडीने सर्व अधिकाऱ्यांनी जाऊन तेथील अन्नाची तपासणी करण्याचा निर्णय घेता. तसेच ही तपासणी केल्यानंतर तपासणीचे नमुने प्रयोगशाळेत पाठविले होते ते नमुने योग्य आले होते. परंतु सर्व लोकप्रतिनिधींनी असा आग्रह धरला होता ज्या ठेकेदाराने हे स्वयंपाक बनविण्याचे काम घेतले आहे तेथे अचानक जाऊन तपासणी करावी आणि तेथे हायजेनिक व्यवस्था नसेल तर कारवाई करावी. त्या अनुषंगाने अधिकाऱ्यांनी अचानक तपासणी केली असता हायजेनिक परिस्थिती आढळून आली म्हणून त्याचा ठेका रद्द करण्यात आला.

डॉ. दीपक सावंत : महोदय, या ठेक्यामध्ये अनहायजेनिक कंडिशन होती त्यामुळे ठेका रद्द करण्यात आला आहे. परंतु एफडीएने येथील अन्नासंबंधीची तपासणी करुन त्या अन्नाचा दर्जा कसा आहे त्यासंबंधीचा रिपोर्ट काय होता ?

श्री. बाळासाहेब थोरात : महोदय, एफडीएकडून जो रिपोर्ट आला होता त्यावेळेस असा प्रश्न निर्माण झाला नाही. परंतु लोकप्रतिनिधींच्या तक्रारींमध्ये तेथे अस्वच्छता असल्याचे सारखे सांगण्यात आले आणि त्यांनी अचानक तपासणी करण्याचा देखील आग्रह धरला. म्हणून अशा प्रकारे अचानक तपासणी करुन हायजेनिकची व्यवस्था नसल्याने हा ठेका रद्द करण्यात आला आहे.

---

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पुणे विद्यापीठाचे कॅम्पस मेकओव्हर करावयाची योजना

**(3) * 3255 श्री.मोहन जोशी, श्री. संजय दत्त, श्री सुभाष चव्हाण, श्री. चरणसिंग सप्रा, श्री. अशोक उर्फ भाई जगताप, प्रा. सुरेश नवले, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री. रामदास कदम, डॉ. निलम गोऱ्हे , श्री. अनिल परब** : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शिक्षण क्षेत्रातील मानबिंदू अशी ओळख असणाऱ्या पुणे विद्यापीठाचा चेहरा बदलण्यासाठी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ.नरेंद्र जाधव यांनी कॅम्पस मेकओव्हर ची योजना सन 2007 मध्ये आखली होती, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाचे नाव उंचावण्यासाठी कॅम्पस मेकओव्हर, ट्रिपल कनेक्टिव्हिटी, असे हाती घेतलेले उपक्रम अद्याप अपूर्ण असल्याचे माहे जानेवारी, 2010 च्या सुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदरचा उपक्रम अपूर्ण असल्यामागील कारणे काय आहेत व शासनाने सदरचा उपक्रम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप, कोणतीच कार्यवाही पूर्ण केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड, श्री. राजेश टोपे यांच्याकरिता** : (1) होय.

(2) हे खरे नाही.

(3) व (4) कॅम्पस मेकओव्हर हा उपक्रम संपूर्णपणे पुणे विद्यापीठाचा असून तो संपूर्णत: विद्यापीठाकडूनच राबविण्यात येत आहे. हा उपक्रम अंशत: पूर्ण झालेला आहे व उर्वरित कामे टप्प्याटप्प्याने पूर्ण केली जात आहे. तसेच ट्रिपल कनेक्टिव्हिटी या उपक्रमाचा पहिला टप्पा चालू होऊन जानेवारी, 2010 पर्यंत काम पूर्ण झाले आहे. अंतिम टप्प्याचे काम चालू आहे. या उपक्रमावरील आर्थिक खर्च विद्यापीठाकडून करण्यात येत आहे.

श्री. मोहन जोशी : महोदय, मुळात माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरातच विसंगती आहे. कारण दुसऱ्या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. तसेच प्रश्न क्र. 3 व 4 च्या उत्तरात सांगितले आहे की, "अंतिम टप्प्याचे काम चालू आहे". दुसरी गोष्ट म्हणजे पुणे विद्यापीठ हे देशातील ऐतिहासिक असे विद्यापीठ आहे. त्याची इमारत हेरिटेज इमारत आहे. तीन वर्षापूर्वी या विद्यापीठाचे मेकओव्हर करण्यासंबंधीचा प्रस्ताव विद्यापीठाने तयार केला होता आणि



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3255..... श्री. मोहन जोशी .....

कामही सुरु केले. 9 फेब्रुवारी, 2009 रोजी या विद्यापीठाचे हीरक महोत्सवी वर्ष सुरु होणार होते व तोपर्यंत हे काम पूर्ण करावे असे ठेकेदाराने लेखी लिहून घेतले होते. परंतु आज 2010 सुरु असताना सुध्दा हे काम संपलेले नाही. माझा पहिला प्रश्न असा आहे की, ज्या ठेकेदाराला काम दिले होते तो ठेकेदार ब्लॅक लिस्टमध्ये असलेला ठेकेदार आहे काय ? त्याचप्रमाणे या ठेकेदाराकडून अटींचा भंग झाला व जनतेच्या 20 लाखाचे नुकसान झाले आहे त्याला जबाबदार कोण आहे ? आणि आता अपूर्ण राहिलेले काम लवकरात लवकर केव्हा पूर्ण होणार आहे ? तसेच ते काम पूर्ण करुन घेण्यासाठी व देखरेख ठेवण्यासाठी शासन एजन्सी नेमणार काय ?

श्रीमती वर्षा गायकवाड : महोदय, पहिला प्रश्न असा आहे की, इंजिनिअरिंग इंडिया लिमिटेड ही कंपनी ब्लॅक लिस्टमध्ये नव्हती तर तिला टर्मिनेट केले आहे. तसेच त्या ठेकेदाराला 20 लाख रुपये अग्रीम दिला होता आणि त्याच्या अकाऊंटवर 20 लाख असे एकूण 40 लाख रुपये ऑक्टोबर, 2008 पर्यंत देण्यात आले होते.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :3255.....

प्रा. वर्षा गायकवाड....

सभापती महोदय,त्यांना आम्ही टर्मिनेट केलेले असून विद्यापीठमार्फतच हे काम सुरु आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी पैशाच्या संदर्भात प्रश्न विचारलेला असल्यामुळे मी सांगू इच्छिते की, यासंदर्भातील पैसे वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे. आता पर्यंत किती कामे झालेली आहेत अशी सन्माननीय सदस्यांनी विचारणा केलेली आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छिते की, या विद्यापीठाची मेकओव्हर करण्याची योजना सन 2007 मध्ये आली होती. परंतु ही योजना जरी सन 2007 मध्ये आलेली असली तरी या योजनेला सन 2008 मध्ये मंजूरी मिळाली होती. या कामाला सन 2008 मध्ये प्रत्यक्षात सुरुवात झालेली असली तरी या योजनेचे काम 5 वर्षात पूर्ण करावयाचे आहे. मला सांगण्यास आनंद होतो की, या योजनेचा एकूण खर्च 137 कोटी रुपये असून पहिल्या टप्प्यात 40 कोटी रुपये खर्च अपेक्षित होते परंतु या 40 कोटी रुपयांपैकी 25 कोटी रुपये पहिल्या टप्प्यात खर्च झालेले आहेत. लँडस्केपींग आणि ब्युटीफीकेशनचे कामास महानगरपालिकेची एनओसी नसल्यामुळे हे काम होऊ शकलेले नाही. पहिल्या टप्प्यातील ट्रिपल कनेक्टीव्हीटीचे काम पूर्ण झालेले आहे. इमारतींच्या दुरुस्तीच्या कामाला सुरुवात देखील झालेली आहे.

डॉ. वसंत पवार :सभापती महोदय, मॅनेजमेंट कौन्सिलचा मी सदस्य आहे. डॉ. नरेंद्र जाधव हे व्हाईस चान्सलर असतांना या विद्यापीठात महत्वाकांक्षी योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पुणे विद्यापीठ ही हेरिटेज इमारत आहे. या इमारतीमधून पाणी लिक झाल्यामुळे ही इमारत खराब झाली होती. त्यामुळे या इमारतीच्या दुरुस्तीसाठी ज्यांना हेरिटेज इमारत दुरुस्त करण्याचा अनुभव आहे अशा ठेकेदाराला या इमारतीच्या दुरुस्तीचे 16 कोटीचे काम देण्यात आले व त्यापैकी 13 कोटी रुपये या इमारतीवर खर्च झालेले आहेत. मला एवढेच विचारावयाचे आहे की, या विद्यापीठातील जवळ जवळ 23-24 इमारतींच्या दुरुस्तीची कामे, म्हणजे होस्टेल,वसतिगृह, निवासस्थाने बांधण्याची कामे सुरु आहेत. त्यामुळे ही सर्व बांधकामे बांधून केव्हा पूर्ण होतील ?

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, डॉ.नरेंद्र जाधव यांनी पुणे विद्यापीठाच्या कॅम्पस मेकओव्हरची योजना अस्तित्वात आणलेली आहे. या ठिकाणची हेरिटेज इमारत ही ब्रिटीशांनी बांधली असून ही इमारत 155 वर्षापूर्वीची आहे. या इमारतीच्या दुरुस्तीचे काम सुरु आहे. तसेच या ठिकाणी 504 मुलींकरिता नवीन वसतिगृहाचे काम सुरु आहे, संगणक अभ्यासवर्गाचे काम सुरु आहे, परदेशी भाषा विषयाच्या वर्गाचे काम सुरु आहे, नॅशनल लॉ स्कुलचे काम सुरु आहे. त्यामुळे हे काम या वर्षाच्या शेवटपर्यंत नक्कीच पूर्ण करण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, या विद्यापीठाचे सर्व काम टप्प्या टप्प्याने 5 वर्षात पूर्ण् करण्यात येईल. परंतु यामध्ये एक महत्वाचा प्रश्न असा उपस्थित होतो की, हा एकूण प्रोजेक्ट 40 कोटी रुपयांचा असून हा खर्च जर आपण 5 वर्षात करणार असाल तर या योजनेवर 40 कोटी रुपयांपेक्षा अधिकचा खर्च होणार आहे काय ? पहिल्या टप्प्याचे काम दिलेल्या कालावधीत पूर्ण झालेले नाही, दुस-या टप्प्याच्या संदर्भात आपल्याला अडचणी आहेत त्यामुळे खर्च वाढण्याची शक्यता आहे. खर्च वाढू नये अशी अपेक्षा आहे. नाही तर सी-लिंकच्या प्रोजेक्टप्रमाणे या कामाचाही खर्च वाढेल, सी-लिंकच्या प्रोजेक्टचा अपेक्षित खर्च 400 रुपयांचा होता परंतु हे काम वेळेत पूर्ण न झाल्यामुळे या प्रकल्पावर 1600 कोटी रुपये खर्च झाले. त्यामुळे पुणे विद्यापीठाच्या कामामध्ये अधिकचा खर्च होईल का यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी माहिती दिली तर बरे होईल.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना मी सांगू इच्छिते की, पुणे विद्यापीठासाठी जो काही खर्च लागणार आहे तो सर्व खर्च पुणे विद्यापीठामार्फत होणार आहे. या विद्यापीठाचा एकूण खर्च 137 कोटी रुपयांचा असून पहिल्या टप्प्यात 40 कोटी रुपये खर्च होणार होता त्यातील 25 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. तसेच लँड स्केपींग आणि ब्युटीफिकेशनच्या कामाला महानगरपालिकेची एनओसी न मिळाल्यामुळे ही कामे सुरु होऊ शकली नाही. तसेच वृक्ष प्राधिकरणाची सुध्दा आम्हाला एनओसी मिळालेली नाही. या प्रकल्पाची सर्व कामे 5 वर्षात पूर्ण करावयाची असल्यामुळे ही सर्व कामे पाच वर्षात पूर्ण केली जातील.

...3



ता.प्र.क्र. :3255.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, पुणे विद्यापीठामध्ये डॉ. नरेंद्र जाधव यांनी महत्वकांक्षी प्रकल्प हाती घेतलेला आहे. परंतु मंत्रीमंडळ स्थापन होतांना जेवढे राजकारण होत नाही त्यापेक्षा जास्त राजकारण कुलगुरु बदलतांना होत असते. त्यामुळे मला असे विचारावयाचे आहे की, या सर्व योजनांमध्ये एकूण किती टप्पे होते तसेच मुळात ही सर्व कामे कधीपर्यंत पूर्ण होणार होती ? तसेच ही सर्व कामे नक्की कधी पर्यंत पूर्ण होणार आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदय सभागृहाला देतील काय ?

यानंतर श्री. गायकवाड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, पुणे विद्यापीठासाठी नवीन कुलगुरुंची नेमणूक करण्यात आली असून त्यांनी आजच पदभारसुध्दा स्वीकारलेला आहे. त्याचबरोबर पुणें विद्यापीठाचा कॅम्पस मेकओव्हर करण्याच्या योजनेतील विविध कामांच्या टप्प्यासबंधी मी सागितले होते की, पहिल्या टप्प्याच्या ट्रीपल कनेक्टिव्हीटीचे काम सुरु आहे आणि कॅम्पस मेकओव्हरचे काम झालेले आहे. दोन तीन फेजची ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे आणि येत्या पाच वर्षात ही कामे पूर्ण करावयाची आहेत.

प्रा.सुरेश नवले :सभापती महोदय, कॅम्पस मेकओव्हर या शब्दाला मराठीतून पर्यायी शब्द कोणता आहे ? कॅम्पस मेकओव्हरची संकल्पना काय आहे ? त्याचबरोबर ट्रिपल कनेक्टिव्हीटीच्या कामावर किती खर्च करण्यात आला आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड :सभापती महोदय, कॅम्पस मेकओव्हर म्हणजे विद्यापीठाचा चेहरा बदलणे आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर या विद्यापीठाचे नाव उंचाविण्यासाठी प्रयत्न करणे. ट्रिपल कनेक्टिव्हीटीच्या पहिल्या फेजच्या कामासाठी किती खर्च करण्यात आला होता असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला असून त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छिते की,2008-2009 सालासाठी 2 कोटी 32 लाख रुपये खर्च करण्यात आला असून 1 कोटी 7 लाख रुपये इनफ्रास्टक्चरसाठी खर्च करण्यात आले असून उर्वरित पैसे सर्व्हिसेससाठी खर्च करण्यात आलेले आहेत त्याचबरोबर 2009-2010 साली 1 कोटी रुपये खर्च करण्यात आले असून हे सर्व पैसे सर्व्हिसेससाठी खर्च करण्यात आलेले आहेत.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, हे काम करणा-या कॉन्ट्रॅक्टरला ब्लॅकलिस्ट करण्यात आलेले नाही असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे परतु त्यांनी दिलेले उत्तर चुकीचे आहे. पुणे महानगर पालिका आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये केलेल्या अनेक कामामध्ये त्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात आलेले होते त्याचप्रमाणे खराडी येथील पाण्याची टाकी कोसळली होती त्या कामामध्ये देखील त्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात आलेले होते.. या निमित्ताने माझी माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, परदेशातील विद्यापीठे सुरु करण्यास आता शासनाने परवानगी दिली असून त्यानुसार राज्यामध्ये परदेशी विद्यापीठे येऊ घातलेली आहेत अशा स्थितीत राज्य स्तरावरील विद्यापीठाच्या कामाच्या दर्जाचे आणि कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी समिती नेमण्यात येणार आहे काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3255.

प्रा. वर्षा गायकवाड : सन्माननीय सदस्य श्री मोहन जोशी यांनी जो पहिला प्रश्न विचारला आहे त्याबाबत मी त्यांना सांगू इच्छिते की, सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी आहे असे समजून सबंधित ठेकेदाराला ब्लॅक लिस्ट करण्यात आले किवा नाही याबाबत चौकशी करण्यात येईल. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला आहे त्यासबंधीची माहिती देखील तपासून पहाण्यात येईल.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**प्राथमिक शाळांसाठी विद्यार्थ्यांना चांगली व दर्जेदार पुस्तके उपलब्ध व्हावी याकरिता निवड समिती नेमण्याची आवश्यकता**

**(४) * ३७६५ श्री. अनिल परब, श्री.किरण पावसकर, श्री.परशुराम उपरकर, श्री. रामदास कदम, डॉ. निलम गोऱ्हे, डॉ. दीपक सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुलींचे शिक्षण व अनुसूचित जाती-जमातीच्या मुलींचे शिक्षण आणि अध्ययन समृध्दी कार्यक्रमांतर्गत तसेच ग्रंथालय समृध्दीकरण योजनेअंतर्गत शासकीय संस्थाकडून सुमारे १४ कोटी रूपयांची पुस्तके खरेदी करणार असल्याची बाब दिनांक २७ जानेवारी, २०१० रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खरेदी कोणत्याही प्रकारची जाहिरात न देता व खाजगी प्रकाशकांना वगळून करण्यात येत आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त संस्थेने प्राथमिक शाळांसाठी या आधी वेळोवेळी मुख्य वर्तमानपत्रात जाहिरात देवून खाजगी प्रकाशकांकडून निवड समितीद्वारे पुस्तकांची अंतिम यादी तयार करून पुस्तके खरेदी केली आहेत हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, विद्यार्थ्यांना चांगली व दर्जेदार पुस्तके उपलब्ध व्हावीत यासाठी पूर्वीच्याच कार्यपध्दतीनुसार निवड समिती नेमून गुणवत्ता व योग्य किंमत हा निकष ठेवून पुस्तके खरेदी करणेबाबत पुढे काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) विद्यार्थ्यांना चांगली दर्जेदार पुस्तके उपलब्ध व्हावीत यासाठी राज्य निवड समिती मार्फत पुस्तकांची निवड करण्यात आली असुन निधी जिल्ह्यांकडे वर्ग करण्यात आला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3765...

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, 162 वर्षा पूर्वी आजच्या दिवशी सावित्रीबाई फुले यांनी प्राथमिक शाळा सुरु केली होती . पहिल्या प्रश्नाला " नाही " असे उत्तर दिलेले आहे. तेव्हा 14 कोटी रुपयांची पुस्तके शासन खरेदी करणार नाही असा त्याचा अर्थ आहे काय ? किंवा 14 कोटी रुपयांची पुस्तके खरेदी करण्याचे शासनाने ठरविले होते व त्यासाठी शासनाने निश्चित केलेली प्रक्रिया योग्य आहे असा त्याचा अर्थ आहे काय ? पहिल्या प्रश्नाचे उत्तर " नाही " असे देण्याऐवजी किती कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे यासबंधीचे उत्तर द्यावयास पाहिजे होते. मला माननीय मंत्री महोदयाना असा प्रश्न विचारावयाचा आहे, किती कोटी रुपयांची पुस्तके खरेदी करण्यात येणार आहेत आणि ही पुस्तके कोणत्या पध्दतीने निवडली गेली आहेत ?

श्री.बाळासाहेब थोरात :सभापती महोदय, पुस्तके खरेदी करण्यासाठी 13 कोटी 70 लाख रुपयांचा निधी देण्यात आला असून अशा प्रकारे शाळांना द्यावयाची पुस्तके खरेदी करण्यासाठी प्रथमच अशा प्रकारचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. या पूर्वी पुस्तक खरेदी करण्यासाठी सह समिती नेमलेली होती आणि विविध पुस्तकांचे प्रकाशक त्यांच्याकडे नोंदणी करीत होते. कोणती पुस्तके खरेदी करावयाची या संबंधीचा निर्णय सह समिती घेंत होती. सर्व शिक्षा अभियानाचा हा निधी असून या पुस्तकांची खरेदी करण्यासाठी प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक निवड समिती नेमण्यात यावी असा या सह समितीने पहिला निर्णय असा घेतला आहे. अशा प्रकारे प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक निवड समिती नेमण्यात आली असून पुस्तके खरेदी करण्यासाठी एकूण 13 कोटी 70 लाख रुपये देण्यात आलेले आहेत. शैक्षणिक उपक्रमासाठी शासकीय संस्था जी विविध प्रकाशने करतात ती पुस्तके खरेदी करण्या सबंधीचा निर्णय घेण्यात आला आहे त्याचबरोबर युनिस्कोची काही प्रकाशने देखील खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही प्रकाशने खरेदी केल्यानंतर बाकीची जी खाजगी प्रकाशने ती खरेदी करावयाची किंवा नाही असा प्रश्न उपस्थित झाला होता. खाजगी प्रकाशनाच्या बाबतीत आतापर्यतचा अनुभव विचारात घेता कोणती पुस्तके खरेदी करावयाची याबाबत प्रधान सचिवांची समिती नेमण्यात आली असून..

नतर श्री.सरफरे

अशुद्धीत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3765....

श्री. बाळासाहेब थोरात ...

कोणती पुस्तके घ्यावयाची हे त्यांनी ठरवावे व त्याप्रमाणे पुस्तके खरेदी करावीत. त्याचप्रमाणे यामध्ये आणखी काही नवीन कार्यप्रणाली निश्चित करणे आवश्यक आहे. कोणत्या पुस्तकांचे टेंडर काढावे याबाबत अनेक वर्षापासून आपल्यासमोर वाद-विवाद होत आले आहेत. म्हणून याकरिता नवीन कार्यपध्दती निश्चित करण्यात येत असून नवीन कार्यप्रणाली अस्तित्वात आल्यानंतर खाजगी प्रकाशकाकडून पुस्तके खरेदी करण्यात येणार आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, शासन कोणकोणत्या विषयांची पुस्तके खरेदी करणार आहे? दुसरा प्रश्न असा की, ज्या 17 सरकारी संस्थांची निवड करण्यात आली आहे त्यांच्याकडून आपण पुस्तके मागविणार आहात काय? महाराष्ट्र शिक्षण परिषद स्वत:साठी 11 लाख 51 हजार 325 रुपयांची पुस्तके खरेदी करणार आहे हे खरे आहे काय? तिसरा प्रश्न असा की, साधारणपणे 1 कोटी 69 लाख 81 हजार 121 रुपये 29 पैसे इतकी रक्कम अखर्चित रहाणार आहे. या अखर्चित रहाणाऱ्या रक्कमेचे आपण काय करणार आहात?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, हा सर्व निधी शासनाकडे प्राप्त झाला आहे अशी परिस्थिती नाही. प्रकाशकाकडून खरेदी करावयाच्या पुस्तकासाठी होणारा जो खर्च आहे, त्याच्या निम्मा खर्च पुस्तकावर होतो. आणि उरलेला निधी खर्च करण्याबाबत जी कार्यपध्दती आहे त्यानुसार प्रकाशकाकडून पुस्तके घेत असतांना कोणती पुस्तके निवडावयाची? यामध्ये वादाचा प्रश्न निर्माण होतो. म्हणून तो वाद विवाद टाळण्याकरिता कोणती कार्यपध्दती असावी? याबाबत माननीय सदस्यांनी जर ती कार्यपध्दती सांगितली तर त्या पध्दतीने जाण्याची शासनाची तयारी आहे. यामध्ये वादविवाद टळावा असा शासनाचा उद्देश आहे, दुसरा कोणताही उद्देश नाही.

श्री. दिलीपराव सोनावणे : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये म्हटले आहे की, "निधी जिल्हयांकडे वर्ग करण्यात आला आहे". माझा प्रश्न असा आहे की, त्या पध्दतीने प्रत्येक जिल्हयाला निधी वाटण्यात आला आहे काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जिल्हयाकडे निधी पाठविल्यानंतर सुध्दा त्यामध्ये वाद विवाद निर्माण होतात. कोणत्या प्रकारची पुस्तके निवडावयाची याबाबत वाद निर्माण होतात. आणि म्हणून जिल्हयाकडे निधी पाठविल्यानंतर त्यामध्ये निर्माण होणारे अनेक प्रश्न टाळण्याकरिता नवीन कार्यपध्दती बनविण्यासाठी आपण थांबलेलो आहोत. त्यामध्ये निकष कोणते



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ ST/

ता.प्र.क्र. 3765...

श्री. बाळासाहेब थोरात....

असावेत हे ठरविणार आहोत. याबाबतीत सभागृहातील सर्व शिक्षक आमदारांची समिती गठीत झाली व त्यांनी पुस्तके निवडली तर शासनाची हरकत राहणार नाही हे मी स्पष्टपणे सांगतो.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या संदर्भात सभागृहातील आम्हा माननीय सदस्यांना काही सूचना करावयाच्या आहेत. मराठी प्रकाशक परिषद ही मराठीतील पुस्तके प्रकाशित करणाऱ्या प्रकाशकांची परिषद आहे. या परिषदेला विश्वासात घेऊन आपण पुस्तकांची यादी मागविणार काय? दुसरा प्रश्न असा की, आमच्याकडील माहितीनुसार या संदर्भात प्रातिनिधिक काम करणाऱ्या संस्था आहेत, प्रकाशकांची परिषद आहे त्यांच्याकडील माहिती घेऊन सरकार निर्णय घेणार आहे काय?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यामध्ये निरनिराळे 150 प्रकाशक आहेत. काही जिल्हयांमध्ये पुस्तकांची संख्या मर्यादित असते. त्यामुळे आपण सर्वांना न्याय देऊ शकत नसल्यामुळे त्यामधून नवीन प्रश्न निर्माण होतात. म्हणून सर्वांना विश्वासात घेण्याची शासनाची तयारी आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील शिक्षण सेवकांच्या मानधनात वाढ करण्याची बाब**

**(5) * 3508 श्री. भगवान साळुंखे, श्री. रामनाथ मोते** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य शासनाने सर्व शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू केला असून शिक्षण सेवकांच्या मानधनवाढीचे आश्वासन तत्कालीन मा.शिक्षण मंत्री यांनी देऊनही अद्यापपर्यंत मानधन मिळत नसल्याचे माहे जानेवारी, 2010 च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने याबाबत आश्वासनाची पूर्तता लवकरात लवकर करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : (1), (2) व (3) शिक्षक सेवकांच्या मानधनात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, मला या विषयाच्या अनुषंगाने दोन-तीन प्रश्न विचारावयाचे आहेत. महाराष्ट्रामध्ये वादग्रस्त ठरलेल्या शिक्षण सेवकांच्या मानधनामध्ये सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे दि.01 जानेवारी 2006 पासून वाढ करण्याच्या बाबतीत मंत्रिमंडळाने निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय ? जर ही बाब खरी असेल तर त्याची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत विलंब का होत आहे ? याची माहिती देण्यात यावी.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जेव्हा शिक्षण सेवकांच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रश्न आला, तेव्हा संचालकांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. त्या समितीने याबाबत निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयाला मान्यता घेण्यासाठी मागील आठवड्यामध्ये 3 तारखेला मंत्रिमंडळापुढे ठेवण्यात आला होता. परंतु त्यादिवशी या विषयाच्या संबंधातील चर्चा स्थगित होऊन, सदरहू विषय पुढे ढकलण्यात आला आहे. आता पुन्हा हा विषय मंत्रिमंडळापुढे आणण्यात येईल.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागामार्फत हा विषय 3 तारखेला मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर ठेवण्यात आला असे वृत्तवाहिन्यामधून, टी.व्ही.वरुन जाहीर झालेले आहे.सध्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सेवकांना अनुक्रमे तीन हजार, चार हजार आणि पाच हजार रुपये मानधन मिळते.आता त्यामध्ये भरीव वाढ म्हणजे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण सेवकांना सात हजार,साडेआठ हजार व साडेअकरा हजार अशी वाढ करण्यात आली आहे अशा बातम्या झळकल्या होत्या. परंतु रात्री तो प्रस्ताव मागे घेतला गेला आहे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3508 . . . .

श्री.वसंतराव खोटरे . . . .

आणि त्याला तूर्त स्थगिती देण्यात आली असे सांगण्यात आले. माझे असे म्हणणे आहे की, शासनाने शिक्षण सेवकांची चेष्टा चालविली आहे. या राज्यामध्ये 50 हजार शिक्षण सेवक आहेत. त्यांच्यासंबंधातील हा प्रश्न कितीतरी दिवसापासून रेंगाळत राहिलेला आहे. आपण या विषयाबाबत मंजूरी दिलेली आहे.त्यामुळे आमचे म्हणणे असे आहे की, येत्या आठ दिवसामध्ये शिक्षण सेवकांच्या मानधनामध्ये वाढ करण्यात येणार आहे काय ? तशा प्रकारचा निर्णय घेणार आहात काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे यांनी या विषयाबाबत वृत्तवाहिनीवरुन, टी.व्ही.वरुन बातमी जाहीर करण्यात आली असे सांगितले. परंतु मला या बातमीचा सोर्स माहिती नाही. पण मंत्रिमंडळाच्या बैठकीचे प्रोसीडींग आहे. त्यानुसार तेव्हा सदरहू विषय पुढे ढकलण्यात आला असून, आता तो नंतर मंत्रिमंडळापुढे येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदय जे उत्तर देत आहेत, त्याबाबतीत मला सांगावयाचे आहे की, या शिक्षण सेवकांच्या संबंधात गॅझेट नोटीफीकेशन झालेले आहे आणि महाराष्ट्र राज्य शासन राजपत्रामध्ये दि.15 फेब्रुवारी 2007 रोजी जाहीर झालेले आहे.त्यानुसार तीन वर्षानंतर त्यांना शिक्षक म्हणून दर्जा दिला जाईल ही बाब मान्य झालेली आहे. शिक्षण सेवकांची जी नेमणूक होते, त्या नेमणुकीच्या जोडपत्र-अ मध्ये सुध्दा तशा प्रकारे स्पष्टपणे नमूद करावे असा हा शासन निर्णय आहे आणि त्याचे गॅझेटमध्ये नोटीफीकेशन झालेले आहे.यामध्ये असे वाक्य आहे की,"शिक्षण सेवक या पदावर तीन वर्षे समाधानकारक काम केल्यानंतर आपणास शिक्षकांच्या नियमित पदावर, नियमित वेतनश्रेणी देण्यास पात्र करण्यात येईल." या गॅझेट नोटीफीकेशनमध्ये त्यांचे जे क्वॉलिफीकेशन दिलेले आहे. त्यानुसार शिक्षकांचे जे क्वॉलिफीकेशन आहे, तेच देण्यात आले आहे. माझा पॉईंटेड प्रश्न असा आहे की, सहाव्या वेतन आयोगाची रचना होत असताना काही वर्गांना अशा प्रकारे लॉक-अप मध्ये टाकता येणार नाही. त्यामुळे मोठया प्रमाणात असमतोल आणि विषमता वाढत जाते. म्हणून पहिली गोष्ट म्हणजे यांच्याबाबतीत कम्पॅरेबल इन्क्रीज दिली पाहिजे हे तत्वत: शालेय शिक्षण विभागाचे प्रमुख म्हणून माननीय मंत्री महोदयांना मान्य आहे की नाही ? दुसरे म्हणजे याबाबतीतील प्रोसेसिंग हे आठ दिवसामध्ये, पंधरा दिवसामध्ये करावयास पाहिजे. कारण ही एक नॅचरल कॉरनरी आहे. तेव्हा आपण ही बाब किती दिवसामध्ये करणार आहात ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यामध्ये सर्व बाबी आहेत, या सगळयाचा विचार करुन जे वेतन, जे मानधन द्यावयाचे आहे ते ठरविण्यासाठी शिक्षण विभागाच्या संचालकांवर ही जबाबदारी टाकण्यात आली होती. त्यांनी या सगळया बाबींचा विचार केला आणि त्या पध्दतीने सूचना केली आहे. आता प्रश्न एवढाच आहे की, मागील मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या वेळी हा विषय पुढे ढकलण्यात आलेला आहे. तो विषय नाकारला गेलेला नाही.

श्री.कपिल पाटील (खाली बसून) : याबाबतीत तुमच्या विभागाचे काय धोरण आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, शिक्षण विभाग म्हणून आम्ही स्वत: धोरण प्रस्तावित केलेले आहे की, यापध्दतीने द्यावे. तेव्हा याबाबतीत शिक्षण विभागाचा प्रस्ताव आहेच. हा प्रस्ताव सध्या मंत्रिमंडळापुढे आहे. फक्त तो विषय सध्या पुढे ढकलण्यात आला आहे. हा प्रस्ताव विचाराधीन आहे आणि त्याबाबतीत निर्णय होईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या सरकारने राज्यातील शिक्षकांना एवढे हलाखीचे व वेठबिगारीचे जीवन जगावयास लावले आहे. अनेक वेळा कोर्टाने देखील आदेश दिलेले आहेत. आपणही सदनामध्ये अनेक वेळेला मांडलेले आहे. माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, आपण मंत्रिमंडळापुढे जो प्रस्ताव ठेवलेला आहे, त्यामध्ये किती वाढ अपेक्षित केलेली आहे ? दुसरा प्रश्न असा की, शिक्षण सेवकाचा काळा कायदा रद्द करुन त्यांना वेतन देण्याच्या बाबतीत सरकार निर्णय घेणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, त्या समितीने सुचविल्याप्रमाणे प्राथमिकसाठी 7 हजार रुपये, माध्यमिकसाठी साडेआठ हजार रुपये आणि उच्च माध्यमिकसाठी साडेअकरा असे सुचविलेले आहे आणि त्यामुळे आज तरी सदरहू प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे विचाराधीन आहे.

अशुध्दीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

ता.प्र.क्र.3508... ..

श्री. बाळासाहेब थोरात...

तो विषय लगेच मंत्रिमंडळापुढे आणण्यासाठी विभाग आग्रही राहील. विधिमंडळाचे अधिवेशन संपण्याअगोदर मंत्रिमंडळामध्ये पुन्हा एकदा त्यावर चर्चा घडवून आणली जाईल, असे मी या ठिकाणी आश्वासन देऊ इच्छितो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महाराष्ट्रातील वीजमाग (पॉवरलूम) विणकर संघटनांनी विविध मागण्यासाठी नविन वस्त्रोदयोग निती अमलात आणण्याबाबतची घोषणा**

**(६) * ३१२० श्री.सय्यद ज़मा, श्री.राजन तेली, श्री. चरणसिंग सप्रा :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील विजमाग (पॉवरलूम) विणकर संघटनांनी विविध मागण्यासाठी दिनांक १० डिसेंबर, २००९ रोजी वा त्या सुमारास मा.वस्त्रोद्योग मंत्र्यांची भेट घेतली त्यावेळी "नविन वस्त्रोद्योग निती" अंमलात आणून कापुस निर्यात बंदी, सुताचे भाव स्थिर ठेवणे, विणकर व मजुरांबाबत निर्णय घेतला जाईल अशी त्यांनी घोषणा केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नविन वस्त्रोद्योग निती अंमलात आणण्यासाठी संबंधीत विभागाने काय उपाय योजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मोहम्मद आरीफ (नसीम) खान** : (१) होय. लवकरच "नवीन वस्त्रोद्योग धोरण" अंमलात आणण्यात येईल केवळ अशी घोषणा केली.

(२) मंत्रिमंडळाची मान्यता घेण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री एस.क्यू. ज़मा :सभापति महोदय, माननीय मंत्री जी ने पावरलूम सेक्टर में काम करने वाले मजदूरों एवम् मालिकों के संबंध में संक्षेप में उत्तर देते हुए कहा है कि नई वस्त्रोद्योग नीति अमल में आने वाली है. मुझे ऐसा लगता है कि अगर नई वस्त्रोद्योग नीति अमल में लाने के लिए विलंब होगा तो बुनकरों की हालत और खराब हो जाएगी. क्योंकि पहले ही पावरलूम सेक्टर के साथ ही साथ इस क्षेत्र में काम करने वाले मजदूरों, बुनकरों की भी हालत खराब है. कृषि उद्योग के बाद कोई बड़ा उद्योग है तो वह वस्त्रोद्योग है. मेरा प्रश्न यह है कि जब तक नई वस्त्रोद्योग नीति अमल में नहीं आ जाती है तब तक पावरलूम सेक्टर में काम करने वाले मजदूरों, बुनकरों को क्या सरकार कोई राहत देगी ? क्योंकि धागे का दाम बढ़ गया है, चार प्रतिशत वॅट लागू किया गया है, मजदूरों, बुनकरों को मकान बनाकर देने की कोई योजना नहीं है. तो इन समस्याओं के बारे में क्या सरकार बुनकरों को कोई राहत दे सकती है ? दूसरा मेरा प्रश्न यह है कि, नई वस्त्रोद्योग नीति के संबंध में बुनकरों की समस्या जानने के लिए, विभिन्न प्रश्नों के संबंध में उनकी राय जानने के लिए, उनके इन्टर एक्शन के लिए क्या सरकार बुनकरों के साथ बैठक आयोजित करेगी ?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता. प्र. क्र. 3120** .....

श्री. नसीम खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सय्यद जमा साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्यामध्ये त्यांनी यंत्रमाग विणकरांच्या सर्वसाधारण मागण्यांबद्दलचे अनेक विषय या ठिकाणी मांडलेले आहेत. सभापती महोदय, नवीन पॉलिसी बद्दल अनेक प्रकारची चर्चा या राज्यामध्ये अनेक ठिकाणी मी स्वत: जाऊन आणि बैठका घेऊन केलेली आहे. या राज्यामध्ये नवीन वस्त्रनिती आली पाहिजे यासाठी मागे सर्वपक्षीय एक बैठक सुध्दा घेण्यात आली होती. यासंदर्भात या व्यवसायाशी जे संबंधित लोक आहेत, त्यालोकांची मते सुध्दा घेण्यात आलेली आहेत व तशा प्रकारची ड्राफ्ट पॉलिसी वस्त्रोद्योगाच्या वेबसाईटवर तीन महिन्यापासून टाकण्यात आली आहे. यासंदर्भात संपूर्ण राज्यातून सजेशन्स आणि ऑब्जेक्शन्स मागवून त्याला फायनल शेप देण्यात आलेला आहे. आणि ते काम प्रगतीपथावर आहे. येणाऱ्या काळात लवकरात लवकर कॅबिनेटची मान्यता घेऊन यासंदर्भातील नवीन वस्त्रोद्योग निती जाहीर करण्यात येईल.

श्री. अरुणलाल गुजराथी : सभापती महोदय, रोजगार निर्मितीच्या संदर्भात वस्त्रोद्योग हा अत्यंत महत्वाचा भाग आहे. गेल्या दोन वर्षाच्या कालावधीत हा उद्योग संकटात आलेला आहे. या व्यवसायाला प्रोत्साहन देण्याच्या संदर्भात सर्वसाधारणपणे कोणत्या बाबी विचारात घेऊन शासन ही पॉलिसी किती दिवसात जाहीर करणार आहे?

श्री. एस.क्यू.ज़मा : सभापती महोदय, मैंने धागे के दाम बढ़ जाने की वजह से समस्या पैदा हो गई है, ऐसा प्रश्न पूछा था. उसका उत्तर नहीं मिला है.

श्री. नसीम खान :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जमा साहेबांनी धाग्याच्या संदर्भात जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, राज्यामधील यासंबंधीचे उत्पन्न, पुरवठा आणि मागणीच्या आधारावर दर अवलंबून असतात. त्यामुळे धाग्याचे दर फिक्स करता येणार नाहीत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुणलाल गुजराथीसाहेबांनी या पॉलिसीमध्ये काय काय आहे? यासंदर्भात प्रश्न उपस्थित केला आहे. सध्या या पॉलिसीमध्ये सर्व क्षेत्रातील विणकर, हातमाग, यंत्रमाग, रेशिम उद्योगाशी जुळलेले शेतकरी आहेत.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 3120..... श्री. नसीम खान .....

कापूस ते कापड बनविण्यासाठी टेक्स्टाईल पार्कची योजना आहे. अशा अनेक योजना या धोरणामध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. मंत्रिमंडळाची मान्यता घ्यावयाची आहे. यामध्ये विणकरांसाठी हाऊसिंग धोरण, ह्युमन रिसोर्स डेव्हलपमेंट, रिसर्क्युलर तसेच यामध्ये हॅण्डलूम सेक्टर आहे, पावरलूम सेक्टर आहे अशा सर्व बाबी लक्षात घेऊन राज्यामध्ये विशेषत: कापूस उत्पादक क्षेत्रात मराठवाडा, विदर्भ तसेच खानदेशचा सुध्दा समावेश करुन, या सर्व बाबी लक्षात घेऊन ड्राफ्ट पॉलिसी तयार करण्यात आलेली आहे. सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांशी चर्चा करुन, सामाजिक संघटनांशी चर्चा करुन, त्या विभागातील जिल्ह्यातील संबंधित लोकांशी चर्चा करुन, सूचना व हरकती मागवून, संबंधित विभागांचा सल्ला घेऊन या राज्यामध्ये चांगल्या प्रकारचे धोरण आणण्याचा प्रयत्न आहे. येणाऱ्या काळामध्ये लवकरात लवकर ते होईल्.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी सुरुवातीला सांगितले की, सर्वपक्षीय बैठक बोलविली होती. त्या बैठकीला कोणाला बोलावले होते ? मी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना विचारले. ते उपस्थित नव्हते. विधान परिषद आपल्या खिजगणतीत नाही काय ? सर्वपक्षीय बैठकीमध्ये विधान परिषद येत नाही काय ? त्या बैठकीला कोणाकोणाला बोलावले होते ? काही सन्माननीय सदस्य श्री. सुभाष देसाई यांचे नाव घेत आहेत. त्यावेळी वेळेवर कोणी पोहोचले नाहीत म्हणून बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी बहिष्कार घातला होता.

श्री. नसीम खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य चुकीची माहिती देत आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर साहेब यांना पत्र पाठविण्यात आले होते. माझ्याकडे त्याची पोचपावती आहे. शिवसेनेचे श्री. सुभाष देसाई साहेब उपस्थित होते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, बहिष्कार घातला होता पण तशा प्रकारचे काही झालेले नाही. ते दोन तास बैठकीत उपस्थित होते. ती बैठक सह्याद्री अतिथीगृहात होती. सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ते दुसऱ्या प्रश्नाशी संबंधित असेल. तो प्रश्न आश्वासन समितीच्या बैठकीच्या संदर्भात होता. आम्ही जी बैठक सह्याद्री अतिथीगृहात घेतली होती ती बैठक 8 तास चालली होती आणि संपूर्ण राज्यातून लोक आले होते. सर्वांनी समर्थन दिलेले आहे, सूचना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिलेल्या आहेत. मी या ठिकाणी आश्वासन देऊ इच्छितो की, आपले आणखी काही प्रश्न असतील तर आपली ड्राफ्ट पॉलिसी वेबसाईटवर आहे. पाहिजे तर आपल्याकडे ड्राफ्ट पॉलिसी पाठवतो. आपल्या काही सूचना असतील तर त्या लेखी द्याव्यात. सर्व संबंधितांशी चर्चा करुन, सल्लामसलत करुन त्याचा समावेश करु.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ SBT/

**जिल्हा परिषद तृतीय श्रेणी बी.एड., डी.एड. शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदली संदर्भात शासनाची अट शिथिल करण्याची मागणी**

**(७) * ३५३२ श्री.कपिल पाटील, श्री. जयंत प्र. पाटील, श्री.जैनुद्दीन जव्हेरी :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद तृतीय श्रेणी बी.एड., डी.एड. आंतरजिल्हा बदली संदर्भात शासनाने १० वर्षाची अट शिथिल करण्याची मागणी इतर संघटनांकडून गेल्या २ महिन्यापासून होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, श्री. जयंत पाटील. यांच्याकरिता** : (१) नाही. जिल्हा परिषदेच्या शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीसंदर्भात किमान १० वर्षाची अट शिथिल करण्याची मागणी कोणत्याही संघटनेकडून प्राप्त झाली नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, शासनाने या प्रश्नाकडे बदलीच्या दृष्टीकोनातून बघू नये. त्या जिल्ह्यातील शिक्षक त्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना मिळाले तर विद्यार्थ्यांना बोली भाषेकडून प्रमाण भाषेकडे जाणे सोपे जाते. जिल्हा परिषदेमध्ये केवळ घर जवळ आहे म्हणून बदली मागितली आहे या दृष्टीकोनातून न पाहिल्यास आपला प्रश्न सुटू शकतो. दुसरी बाब अशी की, 10 वर्षाची अट असल्यामुळे गर्दी जास्त होते. त्यातून गैरव्यवहार होतात, राजकारण करतात. हे सगळे टाळण्यासाठी किमान 5 वर्षापर्यंत अट शिथिल करावी. शासन ते करणार काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, या शिक्षकांची जी नियुक्ती आहे ती जिल्हा कॅडरची आहे त्यामुळे ज्या जिल्ह्यामध्ये त्यांची नियुक्ती होते त्याच जिल्ह्यामध्ये त्यांनी राहिले पाहिजे अशी अपेक्षा आहे. पतीपत्नी एकत्रिकरण, विधवा असेल किंवा गंभीर आजार असेल तर अशा परिस्थिती मध्ये खास बाब म्हणून ...

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी असा प्रश्न विचारला की, याकडे बदलीच्या दृष्टीकानोतून न बघता, माननीय मंत्रिमहोदय जे सांगत आहेत त्यादृष्टीकोनातून न बघता त्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना त्याच जिल्ह्यातील शिक्षक मिळाला तर बोली भाषेकडून प्रमाण भाषेकडे जाणे विद्यार्थ्यांना सोपे जाते. आपण त्या त्या जिल्ह्यामध्ये एकत्रित भरती करुन नेमणुका देतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 3532 ..... श्री. कपिल पाटील...

पुण्याचा शिक्षक चंद्रपूरला गेला तर तो झाडीपट्टीतील भाषा बोलू शकत नाही. चंद्रपूरचा शिक्षक खानदेशात गेला तर तो तेथील अहिराणी भाषा बोलू शकत नाही. खानदेशचा शिक्षक घाटावर गेला तर तो घाटावरील भाषा बोलू शकत नाही. शासनाने वेगळ्या दृष्टीकोनातून हा निर्णय करावा. आधीची आपली भरती करण्यास कोर्टाने परवानगी दिलेली नाही. म्हणून ही अट पाच वर्षे शिथिल करावी. शासन ते करणार काय ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3532....

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या प्रश्नाला उत्तर नाही असे आहे. डिस्ट्रिक्ट कॅडरची नियुक्ती केली जाते त्याबाबत मी सांगू इच्छितो की, ज्यावेळी चंद्रपूर जिल्हयामध्ये भरती चालू असते त्याचवेळी पुणे जिल्हयातही भरती सुरु असते. समजा एखाद्या शिक्षकाला पुण्यामध्ये नोकरी करावयाची असेल तर त्याने पुण्यामध्ये गेले पाहिजे. जी व्यक्ती चंद्रपूरची आहे....

श्री.कपिल पाटील : मंत्रिमहोदयांनी प्रश्न समजून घ्यावा.

**सभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदयांना मी सांगू इच्छितो की, अनेक जिल्हयांमध्ये अपवाद म्हणून असे प्रसंग येतात. पती-पत्नी असा किंवा सैनिकाचा मुलगा असो काही वेळा माणुसकीच्या भावनेतून त्याबाबत विचार केला जातो. मी ग्रामविकास मंत्री होतो त्यावेळेपासून ही पध्दत अनुसरली जात आहे. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे एवढेच आहे की, यामध्ये जी 10 वर्षांची अट आहे ती 5 वर्षांची करता येईल काय, यासंबंधी आपण सहानुभूतीने पहावे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, होय.

**सभापती** : यानंतर ता.प्र.क्र.5097.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी खास बाब म्हणून माझे या प्रश्नाला नाव जोडले असल्याचे आदेश काढण्यात आलेले आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांना मी सांगू इच्छितो की, आपण सन्माननीय राज्यमंत्र्यांना त्यांच्या दालनामध्ये भेटून त्यांच्याबरोबर चर्चा करावी.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**खेड (जि.रत्नागिरी) येथील केमिकल कंपनीमध्ये ९ कामगार जखमी झाल्याची घडलेली घटना**

**(८) * ५०९७ श्री. नितीन गडकरी, श्री. संजय केळकर, श्री. रामनाथ मोते , श्री. पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथील लोटे औद्योगिक वसाहतीतील मे. रत्नागिरी केमिकल कंपनीमध्ये डीएमएस नामक केमिकल ओव्हरफ्लो झाल्याने त्याची वाफ लागून ९ कामगार जखमी झाले असून ३ गंभीर जखमी झाले असुन ३ जणांची प्रकृती चिंताजनक असल्याची घटना दिनांक ४ डिसेंबर, २००९ रोजी वा त्या सुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी तपास करण्यात आला आहे काय,व त्यानुसार जखमी व्यक्तींना आर्थिक मदत देण्यात आली आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पद्माकर वळवी, श्री.हसन मुश्रीफ यांच्याकरिता** : (१) होय, हे अंशत: हे खरे आहे.

सदर कंपनीत दि.४.१२.२००९ रोजी डीएमएस हे केमिकल डे टॅंक मधून ओव्हरफ्लो झाल्याने व ते साफ करत असताना त्यातून निघालेल्या वाफांमुळे ८ कामगारांना श्वसनास, घशास व डोळे चूरचूरणे असा त्रास झाला. सदर कामगारांवर दवाखान्यात उपचार केल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात आले. हे सर्व कामगार दि.१०.१२.२००९ पर्यंत कामावर रुजू झालेले आहेत.

(२) होय.

सदर घटनेची चौकशी करण्यात आलेली आहे. व्यवस्थापनाने औषधोपचाराचा सर्व खर्च केलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "सदर कंपनीत दि.4.12.2009 रोजी डीएमएस हे केमिकल डे टँक मधून ओव्हरफ्लो झाल्याने हा अपघात झाला." यामध्ये असेही नमूद केले आहे की, "या अपघातात 8 कामगारांना श्वसनास, घशास व डोळे चुरचुरणे असा त्रास झाला. सदर कामगार दि.10.12.2009 रोजी कामावर रुजू झाले आहे." या 8 कामगारांपैकी 3 कामगारांची प्रकृती चिंताजनक होती, त्यांची आजची स्थिती कशी आहे, ते हॅण्डीकॅप झाले आहेत काय आणि जे कामगार कामावर रुजू झाले आहेत ते नियमितपणे कामावर येत आहेत काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, या अपघाची चौकशी झाली असल्याचे म्हटले आहे, या चौकशीत काय निष्पन्न झाले आहे ? ठाणे, रायगड जिल्हयात अशाप्रकारे मोठया प्रमाणात आगी लागतात, आग लागल्यानंतर चौकशीचा फार्स होतो, परंतु प्रत्यक्षात त्यानंतर काही कारवाई होत नाही, या अपघाची चौकशी झाली असल्यामुळे त्याचा अहवाल आला आहे काय याची माहिती द्यावी.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, या अपघातामुळे जे कामगार जखमी झाले होते त्यांना किरकोळ जखमा झाल्या होत्या. या अपघातानंतर या कामगारांना डोळे चुरचुरणे, श्वसनास, घशास त्रास झाला, त्यामुळे त्यांना दवाखान्यामध्ये दाखल करण्यात आले होते. त्यापैकी 4 कामगारांना त्याच दिवशी सोडले आहे. उर्वरित 4 कामगारांना दिनांक 6.12.2009 रोजी म्हणजे दोन दिवसांनी सोडले आहे. कामगारांना गंभीर स्वरुपाच्या जखमा नव्हत्या. अशा घटना घडू नयेत यासाठी विभागाचे उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा हे तपास करतात. या कारखान्यात डीएमएस रसायन सांडल्यामुळे कामगारांना बाधा झाली त्या रसायनाचा उत्पादन प्रक्रियेमध्ये वापर करु नये याकरिता कारखाने अधिनियम 1948 चे कलम 40 (2) खाली आदेश पारीत करण्यात आला होता. परंतु कंपनीने आदेशामधील बाबींची पूर्तता केल्यानंतर डीएमएस या रसायनाचा वापर करण्यात येत आहे. या कारखान्याच्या व्यवस्थापनाविरुध्द शासनाने खटला दाखल केला होता. कारखाने अधिनियम 1948 चे कलम 7-ए (ब) (अे) आणि 1963 चा नियम 115(3) च्या भंगाबाबत दि.4.3.2010 रोजी दोन खटले दाखल करण्यात आले आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सेफ्टी अधिका-यांनी या कारखान्याला भेट दिली होती काय आणि त्याची नोंद रजिस्टरवर केली आहे काय ? त्यांनी भेटी दिली असल्यास कंपनीला दक्षता घेण्यासाठी सूचना दिल्या होत्या काय ?

श्री.पद्माकर वळवी : सभापती महोदय, सेफ्टी अधिका-यांनी दिनांक 24.10.2007, दिनांक 29.8.2008 आणि दिनांक 5.12.2009 रोजी भेट दिलेली आहे. त्यांनी व्यवस्थापनाला वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत आणि त्याप्रमाणे व्यवस्थापनाने पूर्ण काळजी घेतलेली आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नोंदी

(ता.प्र.क्र. 5097...

श्री. जयप्रकाश छाजेड : कंपनीमध्ये होणा-या अपघातासंबंधीचे प्रश्न प्रत्येक अधिवेशनामध्ये उपस्थित होत असतात. माननीय मंत्री महोदयांनी मागील आठवडयामध्ये सेफ्टी ऑडिट कमिटी करणार आहोत अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. सेफ्टी ऑडिट कमिटी करण्याचा निर्णय झालेला आहे काय ? अशा प्रकारे कोणती सेफ्टी ऑडिट कमिटी नेमलेली आहे व त्या कमिटीने कोणकाणते सेफ्टी ऑडिट केलेले आहे ?

श्री. पद्ममाकर वळवी : कारखान्यांचे सेफ्टी ऑडिट करण्याचे शासनाने ठरविलेले आहे. सेफ्टी ऑडिटचे रुल्स तयार केलेले असून त्याच्या प्रारुपास विधी व न्याय विभागाने मान्यता दिलेली आहे. त्यावर जनतेच्या सूचना व हरकती मागविण्याचे काम सुरु आहे. त्यानंतर हे सेफ्टी ऑडिट रुल्स विधिमंडळामध्ये मंजूर करुन ते लागू करण्यात येतील.

श्री. रामनाथ मोते : अशा प्रकारची घटना घडली होती आणि त्यामध्ये सुदैवाने कोणी गंभीर जखमी झाले नाही हे मान्य केलेले आहे. औषधाचा किरकोळ खर्च प्रशासनाने दिलेला आहे असे उत्तर दिलेले आहे. हा अपघात व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे घडला का ? चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले ?

श्री. पद्माकर वळवी : चौकशीमध्ये चार बाबी निदर्शनास आल्या. 1) डे टँकची क्षमता कमी असणे, 2) डे टँक ओव्हर फ्लो झाल्यास, जादा रसायन सुरक्षितपणे दुस-या टाकीत नेण्यासाठी ओव्हर फ्लो पाईप बसविलेला नसणे 3) डे टँकला लेव्हल इंडिकेटर आहे, मात्र टाकी भरल्यावर पंप आपोआप बंद होण्याची यंत्रणा बसविलेली नसणे आणि 4) प्लॅटफॉर्म भोवती टी बोर्ड नसल्यामुळे रसायन खालील मजल्यावर व जमिनीवर सांडणे. या प्रकरणी 2 खटले दाखल केलेले आहेत.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला.

---

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र मोटार वाहन (पहिली सुधारणा) नियम, 2010 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एमव्हीआर 0309/545/प्र.क्र.142/परि-2 दिनांकित 11 जानेवारी 2010 सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

--

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, 1994 च्या अनुच्छेद 7 अंतर्गत महाराष्ट्राचे मा. राज्यपाल यांनी वार्षिक योजना 2010-2011 करिता पाटबंधारे विकास क्षेत्र तसेच पाटबंधारे वगळून इतर विकास क्षेत्रातील अनुशेष दूर करण्याकरिता नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय वाटपाबाबत दिलेले दिनांक 19 मार्च 2010 रोजीचे निदेश सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : निदेश सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री. चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 26 मार्च 2010 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणा-या अशासकीय ठरावास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 25 मार्च 2010 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे वेळ देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

**बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव**

1) ठराव क्रमांक 73 - श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

2) ठराव क्रमांक 9 - श्री. केशवराव मानकर, वि.प.स. 50 मिनिटापेक्षा जास्त नाही.

3) ठराव क्रमांक 25 - डॉ. दीपक सावंत , वि.प.स. 50 मिनिटापेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा अशीही शिफारस समितीने केली आहे.

**सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

---

....नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याच्या मुद्यासंबंधी**

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, आपल्या परवानगीने मी एक महत्वाचा मुद्दा मांडू इच्छितो. अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन उद्यापासून पुण्यामध्ये सुरु होत आहे. सम्मेलनासाठी विशेष बाब म्हणून 18 लाख रुपये पाच आमदारांच्या आमदार निधीतून द्यावेत अशी मागणी करण्यात आली आहे. आमदार निधी हा विकास कामासाठी दिला जातो. परंतु हे वर्ष राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. मराठी भाषेचा विकास व्हावा या निमित्ताने पुणे जिल्हा नियोजन विभागाने राज्य नियोजन आयोगाकडे या संदर्भात विचारणा केली आहे आणि शिफारसही केली आहे. याबाबत राज्याच्या नियोजन विभागाने काय निर्णय घेतला आहे वा कोणता निर्णय घेणार आहे असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

**सभापती** : अखिल भारतीय साहित्य सम्मेलनाच्या अनुषंगाने पुण्यामध्ये उद्यापासून साहित्य अखिल भारतीय मराठी सम्मेलन सुरु होत आहे. त्या त्या विभागामध्ये अशा पध्दतीचे मराठी भाषेच्या अनुषंगाने जो कार्यक्रम होतो त्या अनुषंगाने राज्य शासनाने व नियोजन विभागाने आमदारांना सुध्दा अशा साहित्य सम्मेलनासाठी अनुदान देण्याकरिता परवानगी द्यावी अशा प्रकारची सूचना आहे. यापूर्वी सुध्दा अशी सूचना केली होती. मी जरुर नियोजन मंत्र्यांबरोबर आज चर्चा करीन.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो योग्यच आहे. राज्य शासनाने पुणे येथे भरणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनासाठी देणगी दिली. दरवर्षी अशी शासनाकडून देणगी दिली जाते. यावर्षी सुध्दा दिली गेली. माझ्या माहितीप्रमाणे आज ग्रंथ दिंडी निघणार आहे. उद्यापासून रितसर अधिवेशन सुरु होणार आहे. परंतु साहित्य सम्मेलनात होणाऱ्या कार्यक्रमाचे आमदारांना अधिकृत निमंत्रण मिळाले पाहिजे. आम्हाला ते निमंत्रण मिळालेले नाही ही बाब योग्य नाही. मी आपल्या माध्यमातून ही बाब उपस्थित करीत आहे.

डॉ.नीलम गो-हे : आम्हा पुण्यातील आमदारांना निमंत्रण मिळाले आहे.

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या संदर्भात एक महत्वाची बाब निदर्शनास आणू इच्छितो. मुख्य साहित्य सम्मेलनाला आमदार निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने निर्णय घातला असता तर सोपे झाले असते. हा निर्णय तेवढ्यापुरता मर्यादित न ठेवता विविध प्रकारची जी साहित्य सम्मेलने होतात, त्यामध्ये दलित साहित्य सम्मेलन असेल, विद्रोही चळवळीचे साहित्य सम्मेलन असेल अशा साहित्य सम्मेलनासाठी सुध्दा निधी उपलब्ध करुन दिला गेला पाहिजे. खरे जे प्रवाह आहेत त्याना मदत नाकारली जाते आणि एकाच प्रवाहाला मदत दिली जाते. सगळ्या प्रवाहांसाठी मदत देण्याच्या दृष्टीकोनातून निर्णय झाला पाहिजे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, उद्या जे अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलन सुरु होत आहे ते खरे आहे आणि इतर साहित्य सम्मेलने होतात ती खरी नाहीत का?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आताच माननीय मंत्रीमहोदयांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवताना विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, 1994 च्या अनुच्छेद 7 अंतर्गत महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल महोदयांचे निदेश सभागृहासमोर ठेवले आहेत. त्याची प्रत टपाल खणाद्वारे प्राप्त करण्यासाठी मी गेलो असता दुर्दैवाने आम्हाला मराठी भाषेतील प्रत न मिळता फक्त इंग्रजी भाषेतील प्रत मिळाली.

**सभापती** : होय.

श्री.दिवाकर रावते : रोज रोज उठायचे, काय काय बोलायचे असा प्रश्न पडला आहे. आमच्या तोंडून शब्द बाहेर पडतात आणि आपल्याला वाईट वाटते....

**सभापती** : मला वाईट वाटण्याचा संबंध नाही.

श्री.दिवाकर रावते : वारंवार "निर्लज्ज" या शब्दाला सुध्दा कमीपणा वाटेल एवढे हे शासन निर्ढावलेले असल्यामुळे आम्ही करायचे काय?

**सभापती** : सन्माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख सभागृहात उपस्थित आहेत. अशा पध्दतीचा एखादा धोरणात्मक निर्णय असेल तर तो सभागृहापुढे येत असताना मराठी भाषेत कसा येईल, इंग्रजीमध्ये सुध्दा तो असावा. काही वेळेला तो कंसामध्ये नमूद केला जातो. काही वेळेला अशी कागदपत्रे मराठी भाषेत आली तर सदनाच्या दोन्ही बाजूच्या सदस्यांनाही उपयोगाचे होणार आहे आणि मराठी भाषा ही आपली राज्यभाषा आहे यादृष्टीने आपण याची नोंद घ्यावी.

श्री.अनिल देशमुख : नोंद घेण्यात आली आहे.

---

नंतर ओ.1

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: सदस्यांची अटक व त्यांच्या स्थानबध्दतेसंबंधी घोषणा

**सभापती** : मला पोलीस उपायुक्त परिमंडळ-1, यांच्याकडून कळविण्यात आलेले आहे की, सन्माननीय सदस्य व विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. केशवराव मानकर तसेच जैनुद्दीन जव्हेरी यांना दिनांक 23 मार्च, 2010 रोजी मुंबई पोलीस अधिनियम, 1951 च्या कलम 69 अन्वये विधानभवन इनगेट ते उषा मेहता चौक गेट या दरम्यान सकाळी 10.40 वाजता पासून सकाळी 11.00 वाजेपर्यंत ताब्यात घेण्यात येऊन त्यांना त्याच दिवशी दुपारी 12 वाजून 30 मिनिटांनी मुक्त करण्यात आले.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ KTG/

**पृ. शी.** : होटगी (जि. सोलापूर) येथील उर्दू शाळेच्या मुख्याध्यापकाचा मारहाणीमुळे झालेला मृत्यू

**मु. शी.** : होटगी (जि. सोलापूर) येथील उर्दू शाळेच्या मुख्याध्यापकाचा मारहाणीमुळे झालेला मृत्यू यासंबंधी सर्वश्री कपिल पाटील, जैनुद्दीन जव्हेरी, जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"होटगी स्टेशन (जि.सोलापूर) येथील उस्मानिया उर्दू हायस्कूलच्या मुख्याध्यापकांची दिनांक २८ डिसेंबर, २००९ रोजी वा त्यासुमारास संस्थाचालकांनी बेदम मारहाण करुन हत्या करणे, लोकक्षोभ होईपर्यंत गुन्हा दाखल न करण्यात येणे, हत्येचा कट व मारहाण यामध्ये संस्थेचे अध्यक्ष अब्दुल हमीद खान आणि मुनिब अब्दुल खान यांच्यावर कलम ३०२ ऐवजी जामीनपात्र गुन्हे दाखल करण्यात येणे, राजकीय दडपण आणून आरोपींना वाचविण्याचा प्रयन्त सुरु असणे, पोलीस निरीक्षक सुभाष शिंदे यांनी जाणीवपूर्वक प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करणे, सोलापूर जिल्ह्यातील शिक्षकांनी याबाबत न्याय मागण्यासाठी उपोषणाचे आंदोलन केल्यानंतर मुख्य आरोपी सोएब अब्दुल खान याला अटक होणे, मात्र अन्य दोघांवरील कलम ३०२ आरोपपत्रातून वगळणे, शिक्षक संघटनांनी याबाबत सीआयडी चौकशीची मागणी करणे, या संस्थेची मान्यता काढून ही शाळा अन्य संस्थेस हस्तांतरीत करण्याची आवश्यकता असणे, चारही आरोपींवर कलम ३०२ खाली खून व खुनाच्या कटात सामिल असल्याच्या आरोपाखाली गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता असणे, प्रकरण दडपणाऱ्या व जबाबदार असणाऱ्या पोलीस निरीक्षक आणि अन्य अधिकाऱ्यांना निलंबित करुन त्यांच्यावर खटले दाखल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाकडून होत असलेली दिरंगाई, परिणामी शिक्षक व सर्वसामान्य जनतेत निर्माण झालेला असंतोष व संताप, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना तसेच शासनाची प्रतिक्रिया."

श्री. रमेश बागवे (गृह राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : महोदय, लक्षवेधी सुचनेच्या निवेदनातच विसंगती आहे की या प्रकरणी मुख्याध्यापकाला राजीनामा देत नाही म्हणून ठार मारले. पण हे मूळ कारण या निवेदनात लपविण्यात आले मुख्याध्यापक म्हणून ज्याचे नाव उत्तरात आले आहे तोच मुख्य आरोपी आहे. मुख्याध्यापक श्री. तांबोळी ऐवजी श्री. सोहेब-अ-हमीद बलोर खान असा उल्लेख आलेला आहे. श्री. बलोर खान हा मुख्याध्यापक नसून यातील मुख्य आरोपी आहे. अशा प्रकारे एका खुनी व्यक्तिला, संस्था चालकाला मुख्याध्यापक म्हणून मान्यता दिलेली आहे काय ? तसेच ज्यावेळेस शिक्षकांनी आंदोलन केले त्यावेळेस शासनाने याप्रकरणाची दखल घेतली. या मुख्याध्यापकाला 28 तारखेला मारहाण झाली आणि 29 तारखेला त्याचा मृत्यू झाला. ही घटना घडून गेल्यानंतर 5 दिवसांनी त्यासंबंधीची फिर्याद नोंदविण्यात आली आहे. त्यातून जे संस्थाचालक ट्रस्टी आहेत त्या सगळ्यांना 302 च्या कलमातून वगळण्यात आले आहे. हे मुख्य आरोपी असल्याने त्यांच्याविरुध्द कलम 302 लावण्यात येणार काय ?

प्रा.बी.टी.देशमुख : ज्या लक्षवेधी सूचनेवर सभागृहात चर्चा सुरु आहे त्या लक्षवेधी सुचनेचे निवेदन अद्यापही आम्हाला मिळालेले नाही. तसेच आज नियम 93 अन्वये सूचना कामकाज पत्रिकेवर दाखविलेल्या नसताना त्यासंबंधीचे निवेदन वाटप सुरु आहे.....आता लक्षवेधी सुचनेचे निवेदन आम्हाला मिळाले आहे.

श्री. रमेश बागवे : महोदय, या प्रकरणातील सर्व आरोपी अटकेत आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ते मुख्याध्यापक नाहीत. परंतु मौ. होटगी स्टेशन (जि.सोलापूर) येथील जी उर्दू शाळा आहे त्यामध्ये आरोपी हेच मुख्याध्यापक आहेत आणि बाकीच्या आरोपिंना कलम 302 मध्ये अटक का केली नाही असाही प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. वास्तविक मयत इसम श्री. तांबोळी आहे तो सह शिक्षक म्हणून काम करीत होता आणि त्याच्या भावाने बांधकामावर पाणी मारले नाही म्हणून शाळेचा मुख्याध्यापक आणि त्यांचा दुसरा सहकारी श्री. इब्राहिम पठाण.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुद्धीत प्रत / शोधनेसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. रमेश बागवे....

या दोघांनी मयत व्यक्तीच्या घरी जाऊन शाळेचे बांधकाम सुरु होते त्या ठिकाणी आणून बेदम मारले. सभापती महोदय, त्यामुळे या दोघांना कलम 302 खाली अटक करण्यात आलेली आहे. बाकीच्या 3 लोकांना अटक करण्यात आली नाही त्याचे कारण असे आहे की, सदर गुन्हा हा 28 तारखेला घडला. त्याच्या दुस-या दिवशी मयत इसम 29 तारखेला दवाखान्यात जात असतांना या मयत व्यक्तीस रस्त्यात अडवून धमकी दिली की, " तू तक्रार दिली तर आम्ही तुला जीवे मारु." त्यामुळे या प्रकरणात या तिघांचा प्रत्यक्षात मारहाणीमध्ये सहभाग नव्हता त्यामुळे या तिघांवर खुनाचा 302 चा गुन्हा दाखल करण्यात आला नसून जीवे मारण्याची धमकी दिल्यामुळे त्यांच्यावर 301 चा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आलेली नाही. ज्यांनी खून केलेला आहे अशा दोन व्यक्तींवर 302 चा गुन्हा लावून त्यांना अटक केलेली आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या संस्थेच्या एकूण किती शाळा आहेत ? सदर शाळेचे मुख्याध्यापक कोण होते ? मुख्याध्यापकाची नेमणूक रोस्टर प्रमाणे केली होती होता काय ? या घटनेत जो मुख्याध्यापक मारला गेला त्यांनी या संस्थेविरुध्द किंवा संबंधितांविरुध्द पूवी पोलीस स्टेशनमध्ये किंवा शिक्षण मंडळाकडे तक्रार केली होती काय ? तसेच संस्था आणि मयत मुख्याध्यापक यांच्यामध्ये मुख्याध्यापक या पदाच्या संदर्भात वाद सुरु होता काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, या ठिकाणच्या मुख्याध्यापकाची नेमणूक रोस्टर प्रमाणे करण्यात आली होती की, नाही यासंदर्भात शिक्षण मंडळाकडून माहिती घेऊन सदर माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : वाद कशामुळे झाला होता ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, सह शिक्षकाचा भाऊ त्या ठिकाणी शिपाई म्हणून काम करीत होता.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी चुकीचे उत्तर दिले जात आहे.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, मी विचारपूर्वक उत्तर देत आहे. या ठिकाणी जो वाद झालेला आहे तो सहशिक्षक म.हनीफ अमीर तांबोळी यांचा भाऊ या शाळेवर शिपाई म्हणून काम करीत होता. हा शिपाई बांधकामावर पाणी मारण्यास आला नाही म्हणून त्याच्या भावाला....

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेचे लेखी उत्तरच चुकीचे आहे. या शाळेचे मुख्याध्यापक श्री. तांबोळी यांनी राजीनामा देण्यास नकार दिला होता त्यामुळे ट्रस्टीने त्यांना मारहाण केलेली आहे. आपल्या भावाला मुख्याध्यापकीपदी नेमावयाचे होते. या घटनेत त्या ठिकाणच्या मुख्याध्यापकाला शिक्षण विभागाने मान्यता दिलेली आहे काय ? पोलिसांचा तपास पूर्ण झालेला नाही. असे असतांना जो आतमध्ये आहे त्याचा माननीय मंत्री महोदय मुख्याध्यापक म्हणून उल्लेख करतात. या ठिकाणी दुसरेच कारण दिले जात आहेत परंतु प्रत्यक्षात दुसरेच कारण आहे. या घटनेतील जे मुख्य आरोपी आहेत त्यातील एक सोडून सर्व आरोपी बाहेर फिरत आहेत.

प्रा. व्ही.यु.डायगव्हाणे : या ठिकाणच्या गुन्हयात मुख्याध्यापकाला अटक करण्यात आलेली आहे असे माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी सांगितलेले आहे परंतु मुख्याध्यापकाला अटक करुन भागणार नाही तर संबंधित मुख्याध्यापकाला बडतर्फ केले पाहिजे. त्यामुळे ज्या मुख्याध्यापकाला अटक केलेली आहे त्याला बडतर्फ करणार काय ? या संस्थेमध्ये अगोदरच गोंधळ सुरु आहे. त्यामुळे या शाळेवर प्रशासक नेमण्याची कारवाई एक महिन्याच्या आत केली जाईल काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, या गुन्ह्यातील दोघांना कलम 302 नुसार अटक करण्यात आलेली आहे. ज्यांचा या गुन्ह्यामध्ये समावेश नाही अशा तीन लोकांवर कलम 301 चा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आलेली नाही.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांना माननीय मंत्रीमहोदयांनी मुद्देसूद उत्तरे द्यावीत.

प्रा.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, या ठिकाणच्या मुख्याध्यापकांना अटक केलेली आहे. हा प्रश्न अटक करुन सुणार नाही तर या मुख्याध्यापकाला बडतर्फ केले पाहिजे असा माझा पहिला प्रश्न आहे. यासंस्थेत अगोदरच गोंधळ आहे. त्यामुळेच या ठिकाणी खून-खराबा झालेला आहे म्हणून या संस्थेवर प्रशासक नेमण्याची गरज आहे. या संस्थेवर एक महिन्याच्या आत प्रशासक नेमून नंतर संबंधितांवर कारवाई केली जाणार आहे काय ?

यानंतर श्री. गायकवाड...

अशोधित प्रत / मुद्रणेसाठी नाही

श्री.रमेश बागवे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन शिक्षण विभागाशी सबंधित ही बाब असल्यामुळे शिक्षण विभागाला तशी शिफारस करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख :सभापती महोदय, ही बाब शिक्षण खात्याशी सबंधित नाही तर सभागृहाशी सबंधित ही बाब आहे. सभागृहासमोर असे आले आहे की, मुख्याध्यापकाने एका साहाय्यक शिक्षकाला असा फोन केला की, तुझा भाऊ बांधकामावर पाणी मारत नाही. त्यामुळे त्याला मोटारसायकलवर जबरदस्तीने बसवून नेऊन त्याचा खून केला असल्यामुळे संबंधित मुख्याध्यापकाला अटक करण्यात आलेली आहे. त्याला बडतर्फ का करीत नाही असा प्रश्न विचारला असता शिक्षण खात्याला शिफारस करण्यात येईल असे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी दिले आहे. या मुख्याध्यापकाला आताच्या आता बडतर्फ करावे किंवा ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी अशी माननीय सभापतींना हात जोडून विनंती करावी.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, मुख्याध्यापकासंबंधीची माहिती पोलीस तपासात आलेली नाही माहिती घेऊन त्याच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे : माननीय मंत्रीमहोदयांकडे माहिती नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

प्रा.बी.टी.देशमुख : निवेदनामध्ये माननीय मंत्री महोदयांनी लेखी माहिती दिलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, निवेदनात असे सांगितले की, त्या मुख्याध्यापकाला 302 कलमाखाली अटक केलेली आहे . दुस-या बाजुला मंत्री महोदय उत्तर देतांना असे सांगत आहेत की, त्यासबंधीची माहिती आलेली नाही. 302 कलमखाली जर मुख्याध्यापकाला अटक करण्यात आली असेल तर त्याला ताबडतोब बडतर्फ का केलेले नाही ?

श्री.रमेश बागवे : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा आदर करुन मी सांगू इच्छितो की, या गुन्हामध्ये 302 कलमाखाली त्यांना अटक करण्यात आली आहे बाकीच्या तीन लोकांना इतर गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे म्हणून मी सांगू इच्छितो की, तपासामध्ये ही बाब निष्पन्न झाली असेल तर .....

प्रा.बी.टी.देशमुख :सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेतील एक वाक्य मी आपल्याला वाचून दाखवतो. त्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, " सदर हायस्कूलचे मुख्याध्यापक सोहेब अ.हमीद बलोल खान व त्याचा साथीदार इब्राहिम तोजोद्दीन पठाण यांनी प्रथम फोन करुन तुझा भाऊ

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बांधकामावर पाणी मारण्यात आला नाही, तू स्वत:येऊन बांधकामावर पाणी मार अशी धमकी देऊनही तो पाणी मारण्यास न आल्याने सदर दोघांनी त्याचे घरी येऊन त्यास बोलावून घेऊन मोटार सायकलीवर बसवून हायस्कुलचे बांधकामार घेऊन गेले व तेथे हाताने लाथाबुक्याने जबर मारहाण केली " त्यामध्ये त्याचा मृत्यू झाला आहे. तेव्हा 302 कलमा खाली अटक केल्यानंतर ह त्याला बडतर्फ करावयाचे नाही हे मॉडेल विद्यार्थ्यासमोर शासनाला ठेवावयाचे आहे काय ? त्या मुख्याध्यापकाला आताच्या आता बडतर्फ करण्यात येणार आहे काय ?

श्री.रमेश बागवे : या गंभीर बाबीची दखल घेऊन तशी कारवाई करण्यात येईल.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी दिलेली उत्तरे आणि या लक्षवेधी सूचनेसंबंधी करण्यात आलेले निवेदन तपासून पाहिले असतांना मला सुध्दा स्पष्टपणे असे वाटते की, मुख्याध्यापकांना सस्पेंड करण्यात यावे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, " त्या शाळेतील मुख्याध्यापक सोहेब हमीद बलोल खान यांना अटक करण्यात आली असून शिक्षकांच्या आंदोलनाचा या अटकेशी काही सबंध नाही. तसेच सदर गुन्हयातील कोणत्याही आरोपीस भा.दं.वि.कलम 302 च्या आरोपातून वगळण्यात आलेले नाही." या गंभीर आरोपीमध्ये मुख्याध्यापक सुध्दा आलेले आहेत. तेव्हा या मुख्याध्यापकांना त्वरित सस्पेंड करणे आवश्यक असल्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांनी तशी कारवाई करावी.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, होय परंतु मी आपल्या माध्यमातून सभागृहाच्या एक गोष्ट निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सदर व्यक्तिच्या पत्नीने आणि त्यांच्या वडिलानी स्वत: ॲफिडेव्हीट करुन दिलेले आहे की या तीन जणांना त्यातून वगळण्यात यावे .

प्रा.बी.टी.देशमुख : ही बाब तर आणखी भयानक आहे.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, आपण संगितल्याप्रमाणें तशी कारवाई करण्यात येईल.

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे :सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

**उपसभापती** : मी सन्माननीय गृह राज्य मंत्र्यांना सांगू इच्छितो की, एकदा गुन्हा वा तक्रार दाखल झाल्यानंतर त्याबाबत रितसर चौकशी करण्याचे अधिकार पोलिसांना आहेत. एखाद्या गुन्हयात चार पाच जणांची नावे आली असतांना त्यातील काही व्यक्तिची नावे घेण्यात येऊ नयेत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या सबंधी कोणीही ॲफेडेव्हीट केले तरी ते ग्राहय धरण्यात येत नाही. त्यामुळे ज्यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे त्या सर्वाची रीतसर चौकशी होणे आवश्यक आहे असून ती चौकशी करावी त्याचप्रमाणे श्री.अब्दुल हनीफ बलोल खान यांना ताबडतोब सस्पेन्ड करण्याचे आदेश देण्यात यावेत.

श्री.रमेश बागवे :सभापती महोदय, आपण दिलेल्या सूचनेचा आदर करुन त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल.

नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना आपण राखून ठेवावी...

**उपसभापती** : मंत्रिमहोदयांनी आपल्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली असल्यामुळे लक्षवेधी सूचना राखून ठेवण्याची आवश्यकता नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी शेवटी दिलेले उत्तर अत्यंत गंभीर स्वरुपाचे आहे. त्यांनी असे म्हटले की, पतीची हत्त्या झाल्यानंतर मयत व्यक्तीच्या पत्नीकडून "या तिघांना वगळण्यात यावे" असे लिहून घेतले. ही तर कमालच झाली....

(सभागृहामध्ये अनेक माननीय सदस्य उभे राहून बोलू लागतात.)

**उपसभापती** : मयत व्यक्तीच्या पत्नीकडून लिहून घेतलेले ग्राह्य धरण्यात येऊ नये, तसेच पोलिसांच्या तपासामध्येही त्याचा संदर्भ देण्यात येऊ नये असे मी म्हटले आहे.शेवटी गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यामधील कुणाचेही नाव वगळण्याचा आपल्याला अधिकार नाही. आणि जोपर्यंत या प्रकरणी तपास पूर्ण होत नाही तोपर्यंत पोलिसांनाही तशाप्रकारचा अधिकार नाही.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, मुख्याध्यापकांना आजच्या आज निलंबित करणार काय? यावर मंत्रिमहोदयांनी "होय" असे म्हटलेले नाही.

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, आपण निदेश दिल्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आपण आमची भूमिका समजावून घेतल्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. मूळ प्रश्न जागेवरच राहिला आहे. यामध्ये एका व्यक्तीला बडतर्फ करुन हा प्रश्न सुटणार नाही. त्या संस्थेचे संपूर्ण विश्वस्त मारहाणीमध्ये सामील होते. आणि म्हणून या संस्थेची मान्यता काढून घेऊन ती शाळा दुसऱ्या संस्थेकडे हस्तांतरीत करण्याची आवश्यकता आहे. यामध्ये एका व्यक्तिला बडतर्फ केले तरी माणसे तीच राहणार आहेत. यामध्ये मुख्याध्यापक जीवानिशी गेला असून संपूर्ण राजकीय दबाव आणून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्याकरिता या संस्थेची मान्यता काढून घेऊन ती दुसऱ्या संस्थेच्या हातामध्ये सोपविणार काय?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा हा वेगळा प्रश्न आहे.

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : वेगळा प्रश्न कसा काय? खूनाला वाचा फोडणार आहात की नाही? हा आमचा प्रश्न आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यामध्ये जे जे प्रश्न उपस्थित करण्यात आले त्या सर्व प्रश्नांची उत्तरे मंत्रिमहोदयांनी व्यवस्थितपणे दिली आहेत. आता आपण नवीन तिसरा प्रश्न विचारला आहे....

(गोंधळ)

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्येच तो प्रश्न आहे....

**उपसभापती** : त्या संस्थेची मान्यता काढावी असे आपले म्हणणे आहे?

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, नाही. त्याठिकाणी प्रशासक नेमला पाहिजे.

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, संबंधितांवर कडक कारवाई करुन त्यांना निलंबित करु असे सन्माननीय राज्यमंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिले आहे. माननीय सदस्यांनी प्रशासक नेमण्याबाबत व संस्थेची मान्यता काढण्याबाबत प्रश्न विचारला आहे, ही बाब शिक्षण खात्याशी संबंधित आहे.

श्री. कपिल पाटील :सभापती महोदय, आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवली पाहिजे...

**उपसभापती** : मी आता दुसरी लक्षवेधी सूचना पुकारतो...

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, आपण आमच्यावर अन्याय करीत आहात...

**उपसभापती** : मी अन्याय केलेला नाही. त्या संस्थेवर प्रशासक नेमण्याबाबत शासन कारवाई करणार आहे. आपल्या सर्व प्रश्नांना 100 टक्के व्यवस्थित उत्तरे मिळाली आहेत. आपण विचारल्याप्रमाणे मुख्याध्यापकाच्या निलंबनाचा प्रश्न निकालात निघाला. त्याचप्रमाणे सादर करण्यात आलेले प्रतिज्ञापत्र ग्राह्य धरण्यात येऊ नये असे मी सांगितले आहे. प्रशासक नेमण्याबाबत योग्य ती कारवाई करण्यासाठी आपण मंत्रिमहोदयांना थोडा वेळ देणार आहात की नाही? माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांबाबत चौकशी करुन प्रशासक नेमणे आवश्यक असेल तर त्याप्रमाणे मंत्रिमहोदयांनी कारवाई करावी असे मी निदेश देतो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मौजे वरखेड (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकास जाळून ठार मारणे

मु.शी.: मौजे वरखेड (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकास जाळून ठार मारणे यासंबंधी सर्वश्री. विक्रम काळे, रमेश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

"मौजे वरखेड (ता. गंगापूर, जि. औरंगाबाद) येथील गणी लाल शहा नावाच्या जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकास त्याच गावातील तीन गावगुंडांनी दिनांक 1 मार्च 2010 रोजी वा त्यासुमारास जाळून ठार मारणे, सदर प्रकरणी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात येऊनही उक्त शिक्षकास ठार मारणाऱ्या गावगुंडांवर कोणतीही कारवाई न होणे, त्यामुळे त्या परिसरातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये पोलिसांविरुध्द पसरलेला तीव्र असंतोष व नैराश्येचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

श्री. रमेश बागवे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------ (यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मौजे वरखेड (ता.गंगापूर,जि.औरंगाबाद) येथील गणी लाल शहा हे जे मयत शिक्षक आहेत, ते अत्यंत मनमिळावू आणि उत्कृष्ट शिक्षक होते. त्यांची गावामध्ये चांगल्या प्रकारची ख्याती होती. परंतु त्यांना अत्यंत क्रूर पध्दतीने जाळून मारलेले आहे. एकंदर तीन जणांनी त्यांना मारले आहे, त्यांना अटक करण्यात आली आहे असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. परंतु संबंधितांचा खून करण्यामागील कारण अद्यापही स्पष्ट झालेले नाही. त्याच बरोबर मयत शिक्षकांच्या मागे मोठा परिवार आहे. म्हणून यानिमित्ताने माझे दोन स्पेसिफीक प्रश्न आहेत. एक म्हणजे या संपूर्ण प्रकरणाचाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येणार आहे काय? दुसरा प्रश्न असा आहे की, श्री.गणी लाल शहा हे शिक्षक मयत झालेले आहत, त्यांच्या कुटुंबियांना शासनाच्या वतीने आर्थिक मदत देण्यात येणार आहे काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, मयत शिक्षक श्री.गणीशहा लालशहा आणि त्यांचे मित्र श्री.संजय गायकवाड, श्री.प्रकाश हिवारडे व श्री.कचरु उबाळे हे चारही जण एकमेकांचे मित्र होते आणि ते एकाच गावातील रहिवाशी होते. त्यांनी एकत्र बसून दारुचे प्राशन केले आणि त्या नशेमध्ये शिक्षकांना जाळून मारण्यात आले. संबंधित शिक्षकांना उपचारासाठी नेल्यानंतर मरण्यापूर्वी त्यांनी या संबंधित लोकांची नावे सांगितली आणि त्या अनुषंगाने संबंधितांवर कलम 302 (34) प्रमाणे कारवाई करुन सर्व गुन्हेगारांना अटक केलेली आहे. त्यानुसार त्यांना 9 दिवसाचा रिमांड घेतलेला असून, त्यांना 2 वेळा पी.सी.मिळालेला आहे. सध्या ते एम.सी.मध्ये औरंगाबाद येथील जेलमध्ये आहेत.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझ्या एका प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी मयत शिक्षकांच्या कुटुंबियांना मदत देण्याच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या बाबत सांगावयाचे तर संबंधित शिक्षकांच्या कुटुंबियांना मदत करण्याचा शासनामार्फत सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, जे मयत शिक्षक आहेत, त्यांचे नाव सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी शहा असे सांगितले आहे. पण मला वाटते की, त्यांचे नाव हे श्री.मुनिरशहा लालशहा शेख असल्याचे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. या शिक्षकांनी मृत्युपूर्व जबानीमध्ये असे म्हटलेले आहे की, "मला जबरदस्तीने दारु पाजण्यात आली" आणि पोलिसांच्या रिपोर्टमध्ये असे आले की,"त्यांना जास्तीची दारु पाजली".त्याठिकाणी 1 तारखेला नाथशष्टीची दिंडी काढण्यात आलेली होती, तेथे 11.30 वाजेपर्यंत प्रवचन सुरु आहे आणि प्रवचन संपल्यानंतर लगेचच तेथील

. . . .एस-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे . . ..

लोकांच्या लक्षात आले की, संबंधित शिक्षकांना जाळून मारण्यात आलेले आहे. जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये असणारे शिक्षक कधी दारु पिऊ शकतात काय ?

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

त्या शिक्षकांनी मृत्युपूर्व जबानीमध्ये असे म्हटलेले आहे की, "मला जबरदस्तीने दारु पाजली" आणि माननीय मंत्री महोदय उत्तरामध्ये असे सांगत आहेत की, "मला जास्तीची दारु पाजली" असे त्यांनी जबानीमध्ये म्हटलेले आहे. तेव्हा याबाबतीत नेमके काय झाले आहे ? तसेच याचे कारण काय आहे हे पोलिसांनी आरोपींकडून वदवून घेतलेले आहे की नाही ? हे माननीय मंत्री महोदयांनी स्पष्ट केले तर बरे होईल.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, संबंधित शिक्षक आणि इतर तिघेजण हे एकमेकांचे मित्र होते. ते एका गावातील होते. ते एकत्र बसून दारु प्यायले आणि त्यावेळी त्यांनी जास्त दारुचे प्राशन केले. त्यामध्ये त्यांची थोडी बाचाबाची होऊन संबंधित शिक्षकांना जाळण्यात आले आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, याठिकाणी रेकॉर्डवर चुकीचे येत आहे. माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे की, हे सर्वजण मिळून एकत्र दारु पीत होते. पण मला असे वाटते की, ते चुकीचे आहे. कारण मी स्वत: त्या गावामध्ये जाऊन चौकशी केलेली आहे. तेव्हा असे समजले की, संबंधित शिक्षकांना बळजबरीने घेऊन जाऊन, तेव्हा बळजबरीने घेऊन जाणे आणि दारु पीत बसणे हे दोन प्रकार होऊ शकतात. मित्र म्हणून एकत्र बसून पार्टी करणे हा एक प्रकार आहे. परंतु याठिकाणी श्री.शेख या शिक्षकांना तिघाजणांनी बळजबरीने, ओढत नेऊन दारु पाजलेली आहे. त्यामुळे रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये. तेव्हा याठिकाणी कट रचून खून करण्यात आलला आहे. त्यामुळे श्री.शेख यांच्या कुटुंबियांना मदत मिळणे गरजेचे आहे. तसेच या संपूर्ण प्रकरणाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करणार आहात काय ? मला या दोन प्रश्नांची स्पेसिफीक उत्तरे अपेक्षित आहेत.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, पोलीस तपासानुसार संबंधित शिक्षकांना ओढून वगैरे नेण्यात आलेले नाही. शिक्षकांच्या बरोबर त्यांचे मित्र श्री.संजय गायकवाड, श्री.कचरु उबाळे व श्री.प्रकाश बाबासाहेब हिवारडे हे सर्वजण एकाच गावातील होते, ते मित्र होते. हे चारही जण एकत्र बसून दारु प्यायले आणि त्यावेळी त्यांनी दारुचे प्राशन जास्त केले. मग त्यांच्यामध्ये वाद झाला आणि मग त्यांना जाळून मारण्यात आले ही गोष्ट खरी आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या सदनाने सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी आहे असे समजून याबाबतीत चौकशी केली पाहिजे. परंतु मी मघापासून पहात आहे की, माननीय मंत्री महोदय हे अधिकारी जे लिहून देत आहेत, ते वाचून दाखवतात. येथे दोन सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, संबंधित शिक्षकाला सक्तीने दारु पाजली आणि मग कट करुन त्यांना जाळण्यात आले. असे असताना माननीय मंत्री महोदय असे उत्तर देत आहेत की, ते मित्र होते, ते दारु पित बसले होते. ते चुकीचे आहे. सदनामध्ये सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती खरी समजून त्याबाबत चौकशी करावयास पाहिजे.

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, तसे असेल तर याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून तपास करण्यात येईल. .

**उपसभापती** : ठीक आहे.

श्री.रमेश शेंडगे :सभापती महोदय, असे असेल तर शिक्षकांनी दारु पिणे बंद केले पाहिजे.

---

यानंतर कु.थोरात . . ..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील दारिद्रय रेषेखालील जनतेला गेले दोन ते तीन महिने साखर पुरवठा न झाल्याने त्यांना महाग दराने साखर घ्यावी लागणे.

**मु. शी.** : राज्यातील दारिद्रय रेषेखालील जनतेला गेले दोन ते तीन महिने साखर पुरवठा न झाल्याने त्यांना महाग दराने साखर घ्यावी लागणे. यासंबंधी सर्वश्री रामदास कदम, डॉ. दीपक सावंत,सर्वश्री किरण पावसकर, परशुराम उपरकर,डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री दिवाकर रावते,गोपीकिसन बाजोरिया, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक स्वराज्य संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील अशा दोन्ही गटातील नागरिकांना स्वस्त धान्य दुकानातून अन्न धान्याप्रमाणेच सारखेचाही पुरवठा शासन करीत असणे, दारिद्रय रेषेखालील प्रत्येक व्यक्तीला 500 ग्रॅम व दारिद्रय रेषेवरील प्रत्येक शिधापत्रिकेमागे दोन किलो साखरेचे वाटप होत असणे, सदर साखरेचा दर अनुक्रमे 13.50 रुपये व 20 रुपये प्रति किलो असणे, सदर साखर राज्याच्या पुरवठा विभाग सहकारी साखर कारखान्यांकडून खरेदी करण्यात येत असणे, राज्य शासनाच्या पुरवठा विभागाने नियमाप्रमाणे साखरेची मागणी केल्यावर ती साखर शासनाला पुरविण्याची असलेली अट, सध्याचा वाढलेला साखरेचा भाव लक्षात घेवून व राज्य शासनाकडून देण्यात येणारा भाव यामध्ये मोठी तफावत असणे त्यामुळे राज्यातील बहुतांश सहकारी साखर कारखान्यांनी दारिद्रय रेषेखालील नागरिकांना देण्यात येणाऱ्या साखरेचा पुरवठा करण्यास शासनाला स्पष्टपणे नकार देणे, शासनाच्या विविध सवलतींचा फायदा घेणाऱ्या तसेच वेगवेगळया योजनांद्वारे केंद्र व राज्य शासनाची आर्थिक मदत व सवलती घेणाऱ्या साखर कारखान्यांकडून साखर पुरवठा होण्यासाठी तातडीने आदेश देण्याची नितांत आवश्यकता, तसेच साखर कारखान्यांवर दंडात्मक कारवाई करण्याबाबत शासनाची अक्षम्य दिरंगाई व उदासिनता,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

परिणामी राज्यातील दारिद्रय रेषेखालील जनतेला गेले दोन ते तीन महिने साखर पुरवठा न झाल्याने त्यांना महाग दराने साखर घ्यावी लागणे त्यामुळे जनतेमध्ये शासनाविरुध्द पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. अनिल देशमुख ( अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



अशुध्दीत प्रत / अशुध्दीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी याठिक्राणी माननीय मंत्रिमहोदयांना स्पेसिफिक प्रश्न विचारु इच्छितो. दारिद्रय रेषेखालील प्रत्येक व्यक्तीला आपण 500 ग्रॅम साखर देतो. दारिद्रय रेषेवरील प्रत्येक शिधापत्रिकेमागे दोन किलो साखर देतो. दारिद्रय रेषेखालील व्यक्तिसाठी स्वस्तधान्य दुकानातील साखरेची किंमत रुपये 13.50 इतकी आहे. दारिद्रय रेषेवरच्या शिधा पत्रिकाधारकांसाठी स्वस्त धान्य दुकानातील साखरेची किंमत 20 रुपये किलो इतकी आहे. खुल्या बाजारात याच साखरेची किंमत जवळ जवळ 40 रुपये आहे. सभापती महोदय, मी या ठिकाणी स्पेसिफिक प्रश्न विचारु इच्छितो. या ठिक्राणी साखरेचा मोठा तुटवडा पडलेला आहे.याचे उत्तर महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणीमध्ये माननीय मंत्रिमहोदय आपणच दिलेले आहे. तेव्हा आपण मला याठिकाणी वेगळे उत्तर देऊ शकणार नाही. आपण ते पुस्तक वाचले आहे की नाही,हे मला माहीत नाही. या आर्थिक पहाणीच्या पुस्तकातून एक भयानक अशी माहिती बाहेर पडली आहे. सन 2008-2009 मध्ये 18 क्विन्टल साखर उचलावयाची होती त्यापैकी आपण फक्त पाच लाख क्विन्टल लेव्हीची साखर उचलली आहे. सन 2009-2010 मध्ये 21 लाख क्विन्टल साखर उचलावयाची होती त्यापैकी फक्त 10.1 लाख क्विन्टल साखर उचलण्यात आली आहे. सभापती महोदय, गेल्या वर्षी आपण जवळ जवळ 70 टक्के लेव्हिची साखर कारखान्यामधून उचलली नाही. यावर्षी जवळ जवळ 53 टक्के साखर कारखान्यामधून उचललेली नाही. आपल्या हक्काची साखर न उचलल्यामुळे सर्वसामान्य गरीब माणसाला स्वस्तधान्य दुकानातून शिधापत्रिकेवर साखर शासन देऊ शकलेले नाही. त्यामुळे गेल्या वर्षीची लेव्हीची 70 टक्के साखर, यावर्षीची लेव्हीची 53 टक्के साखर गेली कुठे? या साखरेचे पैसे नेमके कोणाच्या खिशात गेले? याला नेमके जबाबदार कोण? याबाबतीत शासन काय कारवाई करणार आहे काय?

श्री. अनिल देखमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी आर्थिक पहाणी अहवालाचा या ठिकाणी उल्लेख केला आहे. आर्थिक पहाणी अहवालामध्ये सन 2008-2009 मध्ये फक्त 30 टक्के साखर उचलण्यात आली असे सांगण्यात आलेले आहे. सभापती महोदय, सन 2008-2009 मध्ये साखरेचे भाव काय होते याची आपल्याला कल्पना आहे. त्यावेळी मार्केटमध्ये 14 रुपयांपर्यंत साखरेचे भाव खाली आले होते आणि शासकीय भाव साडे तेरा रुपये होता. म्हणजे मार्केटमध्ये साखरेचा भाव 14 रुपये आणि शासकीय भाव साडे तेरा रुपये होता

...4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख....

त्यामुळे साहजीकच लोक असे म्हणतात की, कशासाठी स्वस्त दुकानात जावयाचे त्यापेक्षा मार्केटमधून साखर खरेदी करु या. सभापती महोदय, मी त्यावेळची आकडेवारी मी याठिकाणी वाचून दखवितो. जानेवारी, फेब्रुवारी,2008 त्यावेळचा बहुतेक सिंधुदुर्ग, नाशिक, धुळे, रत्नागिरी, नंदूरबार या सगळया जिल्याकडून रिपोर्ट असे आलेले आहेत की, मार्केटमध्ये साखरेचे भाव कमी असल्यामुळे आम्हाला साखरेची उचल करता येत नाही. आणि ही वस्तुस्थिती आहे. भाव जेव्हा वाढतात तेव्हा लेव्हीची साखर उचलली जाते. सन 2008 च्या आर्थिक अहवालामध्ये जो उल्लेख आहे तो त्यावेळी मार्केटचे भाव कमी असल्यामुळे साखरेची उचल झालेली नाही. सन 2009-2010 च्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्यामध्ये शेवटचे तीन-चार महिने असे म्हटलेले आहे. सभापती महोदय, मी यासंदर्भात चार-पाच महिन्यांची आकडेवारी वाचून दाखवितो. यामध्ये एप्रिल महिन्याची साखर सप्टेंबर मध्ये 99 टक्के,ऑक्टोबरमध्ये 95 टक्के, नोव्हेंबरमध्ये 63 टक्के , 86 टक्के, 62 टक्के, 77 टक्के अशी साखर उचलली आहे. बीपीएलची साखर 65 टक्के, 68 टक्के, 73 टक्के,60 टक्के अशा पध्दतीने ही साखर उचलली आहे. जवळ जवळ 60 ते 65 टक्के साखर उचललेली आहे, ही वस्तुस्थिती आहे. ही सर्व आकडेवारी मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो तसेच आपल्यालासुध्दा त्याची प्रत देतो. सप्टेंबरमध्ये 62.32 टक्के, ऑक्टोबरमध्ये 68.49 टक्के,.....

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. अनिल देशमुख .....

नंतर दुसऱ्या महिन्यामध्ये 73.93 टक्के, नंतर नोव्हेंबरमध्ये 60.27 टक्के अशी आकडेवारी आहे. ही सगळी आकडेवारी मी आपल्याला देतो. त्यामध्ये 100 टक्के, 90 टक्के, 80 टक्के उचल झालेली नाही. अंदाजे 60 टक्के उचल झालेली आहे, ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये ज्या कारखान्यांनी आपल्याला साखर दिलेली नाही त्यांची सुध्दा यादी आम्ही केलेली आहे. त्याबाबतीत माननीय आयुक्त, साखर तसेच सहकार मंत्री यांना कळविले आहे. याबाबतीत त्यांच्या माध्यमातून सुध्दा कारवाई चालू आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, उत्तराने माझे समाधान झालेले नाही. सन 2009-2010 मध्ये महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीमध्ये शासनाने जी माहिती दिलेली आहे ती इतकी स्पष्ट आहे की, 21.75 लाख क्विंटल लेव्ही साखर होती त्यापैकी फक्त 10 लाख क्विंटल साखर उचलली. म्हणजे 53 टक्के साखर शासनाने उचलली नाही. एका बाजूला साखरेचे भाव गगनाला भिडत होते. साखरेचा भाव 40 रुपये किलो झाला आणि दुसऱ्या बाजूला सर्वसामान्य गरीब लोकांना रेशनवर साडेतरा रुपये दराने साखर देत नव्हतो. आपली हक्काची 53 टक्के साखर ज्या कारखान्यांनी दिली नाही त्यांच्यासर शासन काय ठोस कारवाई करणार आहे ? कारण या कारखान्यांना सरकार पोसत आहे. जवळजवळ सगळे कारखाने मंत्र्यांचेच आहेत आणि शासनाचे कारखाने आहेत आणि शासनच सर्वसामान्य जनतेला साखरेपासून संचित ठेवत आहे. म्हणून ज्या साखर कारखान्यांनी 53 टक्के आपल्याला साखर दिलेली नाही किंवा सरकारने उचलली नाही त्या साखर कारखान्यांवर शासन तात्काळ काय ठोस कारवाई करणार आहे ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, दिल्लीला जे चिफ डायरेक्टर, शुगर आहेत त्यांना सुध्दा आम्ही कळविले आहे. काही साखर कारखाने आहेत. मी सांगितले की, अंदाजे 60 टक्के साखर उचलली, 30 ते 40 टक्के साखर उचलली नाही. त्यामध्ये काही साखर कारखाने आहेत. त्याबाबत चिफ डायरेक्टर, शुगर यांना कळविलेले आहे आणि त्याबद्दल त्यांच्यावर कारवाई करण्यासंबंधी त्यांना सूचित केलेले आहे. तसेच आयुक्त, साखर यांना सुध्दा संपूर्ण यादी पाठवून ज्या कारखान्यांवर कडक कडक कारवाई करावी आणि त्यांनी 10 टक्के लेव्ही साखर दिलीच पाहिजे अशा पध्दतीने त्यांना सुचविले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय ठोस कारवाई करण्याचे आश्वासन देत नाहीत. दारिद्र्य रेषेखालील लोकांसाठी जी साखर खरेदी केली जाते ती 1350 रुपये दराने खरेदी केली जाते आणि सर्वसाधारण लोकांसाठी 3800 रुपये दराने खरेदी केली जाते. हा जो फरक आहे त्यामध्ये भाव कमी असल्यामुळे दारिद्र्य रेषेखालील लोकांना साखर दिली जात नाही असा माझा ठाम आरोप आहे. आताच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, ठोस कारवाई करणार. आपण केंद्राकडे जाणार आणि केंद्र शासन नंतर कारवाई करणार आणि ते आपल्या कक्षेत नाही असे आपण सांगितले. पण काही गोष्टी आपल्या हातामध्ये आहेत. अशा साखर न पुरविणाऱ्या साखर कारखान्याची मान्यता रद्द करण्याचे धोरण सरकार अवलंबिणार काय ? आर्थिक पाहणी अहवालाप्रमाणे दारिद्र्य रेषेखालील लोकांची संख्या वाढली आहे. त्यामुळे पुन्हा हा प्रश्न उपस्थित होणार आहे. आपण या साखर कारखान्यांची मान्यता रद्द करण्याचे धोरण अवलंबिणार काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, यासंदर्भामध्ये असा प्रश्न उपस्थित झाला की, काही साखर कारखाने लेव्हीची साखर देत नाहीत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय उत्तर देत आहेत त्याबद्दल आनंद आहे. ही लक्षवेधी सूचना अन्न व नागरी पुरवठा मंत्रालयाशी संबंधित आहे आणि आपण उत्तर देत आहात. यामध्ये साखर आयुक्तांचा विषय आला आणि माननीय मंत्रिमहोदय उत्तर देण्यास उभे राहिले त्याबद्दल आनंद आहे. मघाशी शिक्षकांच्या संदर्भातील लक्षवेधी सूचनेच्या वेळी शाळेत झालेल्या गोंधळाबद्दल शिक्षण मंत्र्यांनी उत्तर द्यावयास पाहिजे अशी भूमिका होती. त्यावेळी आपणाकडून आम्हाला सांगण्यात आले की, त्या ठिकाणी गुन्हा घडला आहे म्हणून गृह विभागाची लक्षवेधी आहे आणि त्या विभागाचे मंत्रिमहोदय उत्तर देतील. सदनाचा जो आग्रह असतो त्याबाबत मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, त्या त्या वेळी त्या त्या खात्याच्या मंत्र्यांनी उत्तर दिले पाहिजे. आज आपण संसदीय कार्य मंत्री म्हणून चांगले काम करीत आहात. आपण या ठिकाणी ही पध्दत निर्माण करावी की, जर दोन खाती संबंधित असतील तर त्याही खात्याच्या मंत्र्यांनी या ठिकाणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

येऊन समाधान केले पाहिजे. सभापती महोदय, ही भूमिका मी आपल्या माध्यमातून या ठिकाणी मांडत आहे. याबातीत आपण चांगला निदेश दिला तर भविष्यात बरे होईल्.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, एक तर ही लक्षवेधी सूचना अन्न व नागरी पुरवठा विभागाशी संबंधित असून संबंधित खात्याचे माननीय मंत्रिमहोदय उत्तर देत आहेत. या ठिकाणी साखर कारखान्यांवरील कारवाईच्या संदर्भात तसेच लेव्ही साखरेच्या संदर्भात विषय निघाला. हा विषय महागाईशी निगडीत आहे आणि राज्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे. म्हणून याबाबतीत अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांबरोबर बैठक झाली. जे साखर कारखाने लेव्ही देत नाहीत ती लेव्ही लॅप्स होते असा समज आहे. ती लेव्ही लॅप्स होत नाही. ती लेव्ही कॅरिफॉरवर्ड होते. त्यामुळे तो गैरसमज नसावा. 10 टक्के लेव्ही साखर त्या साखर कारखान्यांनी देणे क्रमप्राप्त आहे. आतापर्यंत सन्माननीय मंत्रिमहोदयांनी चार बैठका घेतल्या. दोन बैठकांना मी स्वत: उपस्थित होतो. त्या बैठकीमध्ये त्याचबरोबर आयुक्त, साखर यांना सूचना दिलेल्या आहेत की शुगर कंट्रोल ऑर्डरच्या माध्यमातून नोटीसेस इश्यू कराव्यात. तशा नोटीसेस आपण इश्यू केलेल्या आहेत. काही कारखान्यांनी साखर दिली परंतु जे नॉमिनी आहेत त्यांच्याकडून पैसे भरण्यास विलंब लागला आणि त्यामुळे कॅरीफॉरवर्ड स्टॉक तसाच पुढे गेला. जेवढी लेव्हीची साखर असेल ती या राज्यातील साखर कारखान्यांच्या माध्यमातून उपलब्ध करुन पीडीएसकरता दिली जाईल. जे कारखाने देणार नाहीत त्यांच्या संदर्भात प्रचलित कायद्यामध्ये जी तरतूद आहे त्यानुसार कारवाई केली जाईल.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : शासनाने निवेदनात मान्य केले आहे की, 53 टक्के साखर उचलली गेली नाही. साखर न उचलणे म्हणजे काळया बाजाराला प्रोत्साहन देण्यासारखे आहे. काळा बाजार करणा-यांवर गुन्हे दाखल केले जातात, साठेबाजावर गुन्हे दाखल केले जातात, तेच गुन्हे साखर न उचलणाऱ्या कारखानदारांवर दाखल करणार काय ?

श्री.अनिल देशमुख : सन्माननीय सहकार मंत्र्यांनी अतिशय सविस्तरपणे उत्तर दिलेले आहे. त्यांच्या माध्यमातून साखर आयुक्त योग्य ती कार्यवाही करतील. आपल्याकडे जीवनावश्यक वस्तू कायदा आहे, त्या कायद्याच्या अंतर्गत सुध्दा कारवाई केली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : मी सन्माननीय सहकार मंत्र्यांना धन्यवाद देतो. जी लेव्हीची साखर होती ती लॅप्स झाल्यानंतर खास बाब म्हणून खुल्या बाजारामध्ये विकण्यासाठी परवानगी दिली होती काय ? माझ्या बँकेमार्फत 12-13 कारखान्यांना वित्त पुरवठा केलेला आहे. त्यांच्या बॅलन्स शिटमध्ये माझ्या निदर्शनास असे आलेले आहे की, जी लेव्हीची साखर लॅप्स झाली ती साखर खुल्या बाजारामध्ये विकण्याची परवानगी खास बाब म्हणून देण्यात आली हे खरे आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, चीफ डायरेक्टर, शुगर, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया याची ॲथोरिटी आहे. लेव्हीची साखर फ्री सेलमध्ये कन्व्हर्ट करण्यासंबंधी राज्य सरकारला कोणताही अधिकार नाही. रिलीज मेकॅनिझम हे केंद्र सरकार ठरविते. रिलीज मेकॅनिझमच्या माध्यमातून दर महिन्याला फ्री सेलचा कोटा जाहीर केला जातो आणि लेव्हीचाही कोटा जाहीर केला जातो. एखाद्या साखर कारखान्याने लेव्हीची साखर त्या महिन्यात विक्री केली नसेल तर ती साखर लॅप्स होत नाही, ती कॅरी फॉर्वर्ड होते. मात्र ओपन मार्केटमधील फ्री सेलची साखर जर त्या महिन्यात जर विक्रली गेली नाही तर त्याचे कन्व्हर्शन मात्र लेव्हीमध्ये होते. आता केंद्र सरकारने फ्री सेल साखर सुध्दा 7 दिवसाच्या आत विकावी असे कडक निर्बंध घातले आहेत. अशाप्रकारचे नवीन नियम केलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी लेव्ही साखर खुल्या बाजारात विकण्याची परवानगी दिली होती का असा प्रश्न विचारला आहे. अशाप्रकारची परवानगी राज्य सरकारने दिलेली नाही. तथापि, सन्माननीय सदस्यांकडे जर माहिती असेल तर ती जरुर शासनाकडे द्यावी. आम्ही ती माहिती चीफ डायरेक्टर, शुगर, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया यांच्याकडे पाठवू.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईत अस्तित्वात असलेली मराठी ग्रंथालये बंद करुन सदर जागा टॉवर व मॉलसाठी देण्याचा घातलेला घाट

**मु. शी.** : मुंबईत अस्तित्वात असलेली मराठी ग्रंथालये बंद करुन सदर जागा टॉवर व मॉलसाठी देण्याचा घातलेला घाट यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, श्रीमती मधु जैन, श्री.भाई जगताप,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई शहर व उपनगरात मराठी वाचकांसाठी दर्जेदार कथा, कादंबरी, नामंवत कथा-कांदबरीकार लेखकांची पुस्तके उपलब्ध होण्यासाठी एकूण 29 मराठी ग्रंथालये सुरु करण्यात येणे, परंतु कालांतराने सद्या फक्त 11 मराठी ग्रंथालये कार्यरत असणे त्यातील नावाजलेल्या सर्वात जुने असे गिरणगावातील गिरगावचे मुंबई मराठी ग्रंथालय, मुंबई महानगरपालिका बंद करण्याच्या विचारात असणे, गिरगावातील ग्रंथालय बंद करु नये यासाठी सर्व स्तरावरुन विरोध होत असणे, अशाप्रकारे मुंबईत अस्तित्वात असलेली एक-एक मराठी ग्रंथालये बंद करुन सदरची जागा टॉवर, मॉलसाठी देण्याचा होत असलेला घाट, याबाबत शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, मराठी वाचकांना दर्जेदार कथा कांदबरी वाचनापासून वंचित राहवे लागणे, शासनाने ग्रंथालयाचे अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करुन तरुण कथा कादंबरी लेखकांना लिहिण्यास व तरुण युवकांना वाचनाद्वारे प्रोत्साहित करण्यासाठी शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना तथा शासनाची प्रतिक्रीया"

प्रा.वर्षा गायकवाड ( वैद्यकीय शिक्षण व तंत्रशिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या लक्षवेधीच्या माध्यमातून एका महत्वाच्या विषयाला वाचा फोडण्यासाठी मला संधी दिल्याबद्दल मी आपले प्रथम आभार मानतो. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची स्थापना 1898 मध्ये झाली होती. थोर स्वातंत्र्य सैनिक लोकमान्य टिळक, एम.जी.रानडे आणि भालचंद्र भाटवडेकर यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले होते. असा इतिहास व वारसा असलेली ग्रंथालये एकेक करुन बंद पडत आहेत. एका बाजूला हे लोकशाही आघाडीचे सरकार माय मराठीचे संरक्षण करण्यासाठी वचनबध्द आहे आणि दुस-या बाजूला मराठी ग्रंथसंग्रहालये बंद होत आहेत त्याची काय कारणे आहेत, यावर विचार होण्याची गरज आहे. सभापती महोदय, मुंबईत अमेरिकन लायब्ररी चालते, ब्रिटिश लायब्ररी चालते, मग मराठी ग्रंथालये का बंद पडत आहेत ? सभापती महोदय, या मराठी ग्रंथसंग्रहालयांना वार्षिक 15 हजार रुपये अनुदान दिले जाते.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याचप्रमाणे नवीन पुस्तके खरेदी न करणे, तरुण वर्गाला आकर्षित करण्यासाठी ग्रंथालय अद्ययावत न करणे, पायाभूत सुविधा नसणे, अशा विविध असुविधा आहेत. हा विषय फार गंभीर आहे. या विषयाशी संबंधित असलेले दोन्ही मंत्री महोदय सकारात्मक भूमिका घेणारे आहेत. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या ग्रंथालयांचे अनुदान वाढविण्याच्या दृष्टीने शासन पावले उलणार आहे काय ? या विषयी माननीय मंत्री महोदय त्यांच्या स्तरावर सर्व लोकप्रतिनिधींसमवेत बैठक घेऊन ग्रंथालयाच्या अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करणार आहेत काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय या संस्थेस संपूर्ण मुंबई परिसरातील म.न.प.च्या मालकीची एकूण 29 ग्रंथालये 1965 पासून म.न.प.च्या सक्षम प्राधिकरणाच्या मंजुरी अन्वये देण्यात आलेली आहेत. करारानुसार मुंबई मराठी संग्रहालयास वार्षिक रु. 15000/- (रु. 1360/- भाडे वगळून ) अनुदान महानगरपालिकेतर्फे देण्यात येते. सध्या 29 पैकी 17 ग्रंथालये कार्यरत आहेत. सभासद संख्या 50 पेक्षा कमी असल्यामुळे आणि करारबाह्य झाल्यामुळे 11 ग्रंथालये बंद करण्यात आलेली आहेत. गोखले रोड वरील ग्रंथालय हे धोकादायक इमारतीमध्ये असल्यामुळे इमारत दुरुस्तीचे काम सुरु आहे. ते काम पूर्ण झाल्यानंतर तेथे ग्रंथालय सुरु करण्यात येईल. या प्रश्नाकडे पाहाण्याचा शासनाचा दृष्टीकोन सकारात्मक असून सर्व ग्रंथालये सुरु करण्याचा प्रयत्न शासन करणार आहे.

श्री. भाई जगताप : माननीय राज्यमंत्री महोदयांनी या प्रश्नाला मनापासून उत्तर देण्याचा प्रयत्न केला. परंतु न्याय देण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांच्या हातात जेवढे आहे तेवढे त्या करीत आहेत. या ठिकाणी माननीय मंत्री महोदय उपस्थित आहेत. खरे म्हणजे या प्रश्नाच्या मुळाशी जाण्याची गरज आहे. 1965 पासून ही ग्रंथालये चालू आहेत आणि केवळ 15 हजार रुपयाचे अनुदान दिले जात आहे. हे अनुदान इतके तुटपुंजे आहे की, त्यामध्ये ग्रंथपालाला पगार कसा देणार, नवीन पुस्तके खरेदी कशी करणार आणि तरुणांना आकर्षित करण्यासाठी ग्रंथालये अद्ययावत कशी करणार हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी अतिशय पोटतिडकीने या ठिकाणी प्रश्न मांडलेला आहे. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, ग्रंथालयांसाठी राज्य व जिल्हा योजनांतर्गत सुमारे 70 ते 75 कोटी रुपये आर्थिक तरतूद करण्यात येते. त्यापैकी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भाई जगताप....)

सहाय्यक अनुदानासाठी योजना व योजनेत्तर 58 कोटी रुपये शासनाकडून वितरित केले जातात. 15000/- रु. अनुदान हे कालबाह्य झालेले आहे. तेव्हा ग्रंथालयांचे संवर्धन करण्यासाठी हे अनुदान वाढवून ते डबल करण्यात येईल काय ? करारबाह्य झाल्यामुळे 11 ग्रंथालये महानगरपालिकेने बंद पाडलेली आहेत. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन माननीय मंत्री महोदय, राज्यमंत्री महोदय, आमदार, लोकप्रतिनिधी, संबंधित प्रशासन हे एकत्र बसून अनुदानाच्या आणि ग्रंथालये संवर्धनाच्या बाबतीत काही ठोस निर्णय करणार आहेत ?

श्री. राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून महत्वाचा प्रश्न उपस्थित केला. त्यानुषंगाने सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनीही महत्वाचे प्रश्न उपस्थित केले.

....श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4.... श्री.राजेश टोपे....

सभापती महोदय, मी या संदर्भात एवढेच सांगेन की, ही अत्यंत जूनी ग्रंथसंग्रहालये आहेत. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी 60 कोटी रुपये अनुदानाचा विषय मांडला. मुंबई महानगरपालिका चालवित असलेली ग्रंथालये आणि राज्य शासनाचा उच्च शिक्षण विभाग चालवित असलेली ग्रंथालये असे वेगवेगळे विषय आहेत. हा प्रश्न मुंबई महानगरपालिकेची ग्रंथालये आणि मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर या संस्थेच्या वतीने जी 29 ग्रंथालये चालविली जातात, या 29 पैकी मुंबई महानगरपालिकेच्या जागेवर वा इमारतीमध्ये ही ग्रंथालये सुरु आहेत. या ग्रंथालयांना प्रतिवर्ष 15 हजार रुपये अनुदान दिले जाते. या अनुदानामध्ये वाढ केली जाणार आहे. हा 15 हजार रुपयांचा करार झालेला आहे. मुंबई महानगरपालिकेने करारानुसार ही 15 हजार रुपयांची रक्कम निश्चित केली आहे. ही रक्कम वाढवून मिळण्याबाबतचा प्रस्ताव मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वतीने सादर केलेला नाही. राज्य शासनाच्या वतीने जी ग्रंथालये चालविली जातात त्यांना निश्तिचप्रकारे वार्षिक अनुदान यापेक्षा खूप जास्त मिळत आहे. मुंबई महानगरपालिकेने अनुदान वाढविले पाहिजे या मताशी मी सुध्दा सहमत आहे. त्यामुळे सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन राज्य शासनाच्या वतीने मुंबई महानगरपालिकेला सूचित करु की, कोणत्याही परिस्थितीत आपण चालवित असलेली ग्रंथालये आहेत त्यांच्या अनुदानाचे दर खूप जूने असल्यामुळे ते वाढविले पाहिजेत. त्या संदर्भात आणखी काही अडचणी असतील. 11 ग्रंथालये बंद पडली आहेत ती सुरु व्हावीत अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. 50 पेक्षा कमी सभासद संख्या झाल्यामुळे ती बंद पडली असे याठिकाणी सूचित केले आहे. मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने हे काम केले जाते. त्यांना आमच्या दालनात बोलावून बैठक घेऊ व सदस्य संख्या वाढली पाहिजे यादृष्टीने आवाहन करु. ही 11 ग्रंथालये ज्या कारणामुळे बंद पडली आहेत ती कारणे शोधून निश्चितप्रकारे ही 11 ग्रंथालये सुरु केली जातील हे मी सांगू इच्छितो.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी मुंबईतील ग्रंथालयांसंबंधी सांगितले आहे. मराठी शाळा बंद पडत आहेत तशी राज्यातील मराठी ग्रंथालये बंद पडत आहेत. राज्याचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. निवेदनात म्हटले आहे की, संस्कृती रुजविण्यासाठी, जोपासण्यासाठी व तिचा विकास करण्यासाठी आणि उच्च वाचन अभिरुची निर्माण करण्यासाठी शासन प्रयत्नशील राहील. सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये राज्यात मोठया प्रमाणात ग्रामीण भागामध्ये

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

जी ग्रंथालये आहेत त्यांच्याकडे दुरुस्तीसाठी पैसा नाही, काही वेळेला अपुरे अनुदान मिळते. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्ताने या ग्रंथालयांना मोठया प्रमाणात प्रोत्साहन देण्यासाठी इमारत दुरुस्ती वा इमारत बांधकामासाठी विशेष सहाय्य केले जाईल काय? 100 वर्षे पूर्ण झालेल्या ग्रंथालयांसाठी शासनाने विशेष योजना आखली होती. त्याच धर्तीवर सुवर्ण महोत्सवी वर्षात ज्या ग्रंथालयांना 50 वर्षे पूर्ण झाली आहेत त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. त्यांना विशेष योजनेद्वारे सहकार्य करणार आहात का?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, ग्रंथालयांसाठी राज्य व जिल्हा योजनेद्वारे सुमारे 70 कोटी रुपयांची तरतूद केली जाते. त्या व्यतिरिक्त सहाय्यक अनुदान योजनेंतर्गत 58 कोटी रुपये वितरीत केले जातात. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी अनुदान वाढविण्याबाबत प्रश्न विचारला आहे. 1970 सालापासून 5 वेळा अनुदानात शासनाने वाढ केली आहे. 50 वर्षे पूर्ण झालेल्या ग्रंथालयांना विशेष सहाय्य देणार आहात का असा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी उपस्थित केला आहे. हा अत्यंत चांगला प्रश्न आहे. या प्रश्नाचा नक्की विचार करु.

(नंतर श्री.खर्चे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांना मी धन्यवाद देतो कारण त्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. हा प्रश्न माजी सन्माननीय सदस्य श्री. गंगाधर पटने नेहमीच सभागृहात उपस्थित करीत होते. मुंबईतील ग्रंथालयांचा विषय या ठिकाणी मांडण्यात आला असून 50 वाचक नसल्यामुळे जी 11 ग्रंथालये बंद झाली ती पुन्हा चालू करण्याचे शासनाने सांगितले. पण उत्तरात असे म्हटले आहे की, "समाज प्रबोधनाच्या, लोकशिक्षणाच्या या चळवळीला अशा प्रकारे राज्य शासन विविध मार्गांनी भरघोस सहाय्य करीत आहे आणि पुढील काळातही निश्चितपणे अशी मदत करण्याची शासनाची भूमिका राहणार आहे. राज्यात वाचक संस्कृती रुजविण्यासाठी, जोपासण्यासाठी व तिचा विकास करण्यासाठी व उच्च वाचन अभिरुची निर्माण करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे". ही सर्व वाक्ये वाचल्यानंतर शासन या योजनेअंतर्गत नेमके कोणते प्रयत्न करणार आहे ? जेणेकरुन लोक वाचायला येतील. सन्माननीय सदस्यांनी मांडलेला मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. वास्तविक आता परिस्थितीत बदल झालेला आहे. ग्रंथालयांमध्ये सध्याच्या परिस्थितीत बाबा आदमच्या काळातील तेच बाके, त्याच खुर्च्या आणि काळवंडलेल्या भिंती आणि सगळीकडे अंधार अशा वातावरणात पुस्तक वाचण्यासारखे वातावरण नसते. म्हणून वाचकांचा विचार करुन नवीन पध्दतीने कोणत्या सुविधा देणे आवश्यक आहे त्यासाठी निधीची गरज आहे. असा निधी महापालिका उपलब्ध करुन देऊ शकणार नाही. मुंबई महानगरपालिकेचे ग्रंथालय हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे बनवावयाचे असेल तर त्यासाठी शासन काही तरी ठोस मदत करणार काय ? तसेच वाचन संस्कृती वाढविण्याचा जो प्रयोग आहे तो सफल झालेला नाही तो सफल करण्याचा प्रयत्न शासन करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अत्यंत महत्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. यासंदर्भात शासनाची जी भूमिका आहे ती म्हणजे उच्च वाचन अभिरुची निर्माण करण्यासाठी खऱ्या अर्थाने वाचन संस्कृती रुजविणे, तपासणार, वाढविणार आणि विकास करणार अशी शासनाची अत्यंत स्वच्छ स्कीम आहे. गांव तेथे ग्रंथालय व्हावे म्हणून दरवर्षी शासन नवीन 2000 ग्रंथालयांना मान्यता देत आहे व त्यावर जवळपास 60 ते 75 कोटी एवढे खास अनुदान देत आहे. अशा परिस्थितीत शासनाची अशी स्पष्ट



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

भूमिका आहे की, वाचक वर्ग वाढला पाहिजे व त्यादृष्टीने ही जी स्कीम आहे त्यामध्ये कितीही वाढ करावी लागली तरी ती शासन देणार तसेच ग्रंथालयांचे जेवढे योग्य प्रस्ताव असतील त्या सर्व प्रस्तावांना आपण नेहमीच मंजुरी देतो. मग अशी ग्रंथालये 2 हजाराऐवजी दरवर्षी 4 हजार जरी असले तरी त्यांना शासन मान्यता देणार. ज्याप्रमाणे आपण ग्रंथालयांची संख्या वाढविणार तेव्हा त्यांना अनुदान देण्यासंबंधीची भूमिका देखील पॉझिटिव्हच राहणार आहे. तीन वर्षापूर्वीच या अनुदानात वाढ करण्यात आली असून ग्रंथालय चव्वळीत काम करणाऱ्या संघटनांचे सुध्दा सातत्याने असेच मत आहे, की ग्रंथालयांना अनुदान वाढविलेले आहे. अशा प्रकारे शासन "अ", "ब", "क" आणि "ड" वर्गीय ग्रंथालयांच्या अनुदानात वाढ करण्याच्या दृष्टीने कॅबिनेटसमोर जाऊन निर्णय घेणार आहे. त्याचबरोबर मुंबई महानगरपालिकेतर्फे चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयांच्या संदर्भात मी सांगू इच्छितो महानगरपालिकेला तशा सूचना देण्यात येतील. वास्तविक 15 हजार रुपये अनुदान अत्यंत तुटपुंजे आहे म्हणून माझे म्हणणे एवढेच आहे की, मुंबई शहरासारख्या ठिकाणी महापालिकेच्या वतीने चालविण्यात येणारे ग्रंथालय सुसज्ज असावे, त्यातील फर्निचर चांगले असावे, रॅक्स सुस्थितीत असावीत, अंधार वगैरे नसावा व चांगले वातावरण तेथे असावे. याबाबतीत 15 हजार रुपयांऐवजी त्या अनुदानात भरीव अशी वाढ करता येईल काय यासाठी महापालिकेच्या आयुक्त तसेच संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून बैठक आयोजित करुन त्यांच्याशी चर्चा करण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ....

त्यामुळे ग्रंथालयाच्या संदर्भात मुंबई महानगरपालिकेला योग्य त्या डायरेक्शन देऊ. मुंबई महानगरपालिकेचा कायदा आहे त्या कायद्यातील 520 (क) नुसार शासनाला जे विशेष अधिकार देण्यात आलेले आहेत त्याचा वापर करुन त्यासंदर्भात योग्य ते निर्णय मुंबई महानगरपालिकेला दिले जातील.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सध्या सुरु असलेली जी ग्रंथालये आहेत त्या ग्रंथालयाच्या संख्येत वाढ न होता उलट असलेली ग्रंथालये आता बंद पडू लागली आहेत. त्यावरुन एकूणच आपण आपल्या भाषेविषयी किती आस्थेने ग्रंथालये प्रगत होण्यासाठी प्रयत्न करतो हे दिसून येते मुख्यत: गेल्या काही शतकापासून सुरु असलेल्या ग्रंथालयाच्या व्याख्येत बदल करण्याची वेळ आलेली आहे. या ग्रंथालयांना आधुनिक धोरणाची आणि सर्व साधनाची जोड दिली गेली तरच आपली ग्रंथालये जीवंत राहू शकतीतल. नाही तर आपण ग्रंथालयांसाठी कितीही अनुदान दिले, ग्रंथालयांच्या पुस्तकांची संख्या वाढवली म्हणून ग्रंथालयात वाचक येतील अशी परिस्थिती राहिलेली नाही. आश्चर्याची गोष्ट अशी आहे की, कालच्या वर्तमानत्रात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष श्री. बराक ओबामा यांच्या पुस्तकाच्या मराठी भाषांतराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता व त्यासंदर्भातील इतर माहिती देण्यात आली होती. हा समारंभ अमेरिकेन एम्बेसीने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मुंबईत घेतला. आपल्याच राजधानीमध्ये मराठी भाषेचा सन्मान करण्यास इतर देशातील लोक पुढे येत असतांना याबाबतीतील आपली उदासिनता प्रकट होणे योग्य नाही. साहित्याचा एकूण संदर्भच बदलले असल्यामुळे त्याचा अभ्यास करण्याची वेळ आता आलेली आहे. खरे म्हणजे ग्रंथालयात वाचकांनी अधिक संख्येने यावयास पाहिजे म्हणून कथा, कादंबरी एवढया पुरता हा विषय मर्यादित न राहता अतिशय व्यापकपणे यामध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे अशी सुधारणा करण्यासाठी, त्याचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नेमून ग्रंथालये विस्तारीत करण्याबरोबर ग्रंथालयांचे मूल्य कसे वाढेल यादृष्टीने शासन गंभीरपणे प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा मुद्दा सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी उपस्थित केलेला आहे. या निमित्ताने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, शासनातर्फे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

मुंबईतील अंधेरी येथे डिजीटल ग्रंथालय सुरु करण्यात आलेले आहे. त्यामुळे डिजीटल ग्रंथाले जिल्हा स्तरावर सुरु व्हावीत असा देखील शासनाचा मानस आहे. मला सांगावेसे वाटते की, प्रत्येक तालुक्यांमध्ये ब्रॉडब्रॅंडचे कनेक्शन्स आपल्याला मिळू शकते. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी ब्रॉडब्रॅंडचे कनेक्शन्स उपलब्ध झालेले आहेत अशा ठिकाणच्या ग्रंथालयांना इंटरनेटचे कनेक्शन्स देण्याच्या बाबत राज्य शासन निश्चित प्रकारे प्रयत्न करेल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये ग्रंथालयाच्या संदर्भात महत्वाचा इशारा देण्यात आलेला आहे परंतु तो विषय बाजूला पडलेला आहे असे दिसते. ग्रंथालयाच्या कर्मचा-यांच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तरे दिलेली आहेत. खरे म्हणजे ग्रंथालये स्वातंत्र्यपूर्व काळात सुरु झाली होती. त्या ग्रंथालयांच्या संदर्भात लोकमान्य टिळकांचा उल्लेख मघाशी सन्माननीय सदस्यांनी केलेला होता. गणेशोत्वाच्या सोबतच अनेक साहित्यीकांनी चळवळीला पाठबळ देण्यासाठी आपल्या साहित्याचा उपयोग केला होता. ग्रंथालयाने फार मोठी भूमिका बजावली होती. स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रंथालयाच्या समृध्द अशा इमारती म्हणजे नागपूरचे राजाराम वाचनालय, अमरावतीचे नगरचे वाचनालय, आर्वी, आचलपूर, खामगाव तसेच अलिबाग येथे सुध्दा समृध्द वाचनालये आहेत. तसेच अनेक ठिकाणी समृध्द वाचनालये आहेत. ग्रंथालये बंद करण्याविषयी आज घाट घातला जात आहे. ग्रंथालयांना शासन वर्षानुवर्षे अनुदान देत आहे. ग्रंथालयाच्या अनुदानात वाढ करण्याबाबत माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी माहिती दिलेली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात खाजगी लोकांनी निर्माण केलेल्या ग्रंथालयांना राज्य शासनाने स्वातंत्र्योत्तर काळात पाठबळ दिल्यामुळे ग्रंथालये ख-या अर्थाने टिकून राहिलेली आहेत.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख .....

याबाबतीत माझे एकच म्हणणे आहे की,आज तशी काही आपत्ती आलेली आहे असे त्या निवेदनातून दिसत नाही. परंतु शासनाने त्या पासून बाजूला राहण्याचा भाग मात्र या निवेदनातून दिसून येत आहे. अशा प्रकारे ग्रंथालये आणि वाचनालयाच्या बाबातीत जे काही घडत आहेत त्याप्रमाणे काही दिवसानंतर शाळांच्या बाबतीतसुध्दा तसेच घडू शकेल. वर्षानुवर्षे अनुदान घ्यावयाचे परंतु ती जागा मध्यवस्तीत आल्यानतर त्या जागेवर मॉल किंवा मंगल कार्यालये बांधावयाची असे होता कामा नये. आजच्या लक्षवेधी सूचनेमध्ये त्यासंबंधीचा प्रश्न उपस्थित करण्यात आला असला तरी अशी आपत्ती आलेली नाही असे या निवेदनात म्हटलेले आहे. परंतु काही वर्षानंतर जर अशा प्रकारचवी आपत्ती आली तर त्यावेळी शासनाचे धोरण तयार असले पाहिजे त्यासाठी लॉग टर्म प्रपोजल तयार करावयास पाहिजे. त्यासंबंधी माननीय मंत्र्यांनी उत्तर द्यावे असे मी म्हणत नाही. परंतु काही शाळा महाविद्यालयाच्या बाबतीत जशी आपत्ती आलेली आहे तशीच आपत्ती या ग्रंथालयावर येईल तेव्हा त्या बाबतीत शासनाने ठाम धोरण घेतले पाहिजे. स्वातंत्र्याच्या आंदोलनातील सुरुवातीचे प्रबोधनाचे हे काम विचारात घेता या चळवळीतून पळून जाण्याची कोणालाही परवानगी देता येणार नाही या दृष्टीने धोरण ठरविण्याचे काम शासन करणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यानी जी सूचना केली आहे ती निश्चितपणे स्वागतार्ह आहे. त्या सूचनेचा शासन अत्यंत गांभीर्याने करील.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

पृ.शी.भिवंडी निजामपूर मधील स्व.श्रीमती इदिरा गांधी स्मृती रुग्णालय शासनाकडे हस्तांतरण करण्यामध्ये होत असलेली दिरंगाई

मु.शी..भिवंडी निजामपूर मधील स्व.श्रीमती इदिरा गांधी स्मृती रुग्णालय शासनाकडे हस्तांतरण करण्यामध्ये होत असलेल्या दिरंगाईबाबत श्री.मुझफ्फर हुसेन,वि.प.स. यांनी दिलेली विशेंष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.मुझफ्फर हुसेन (विधान सभेने निवडलेले) :सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो :-

"सभापती महोदय, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे स्व. श्रीमती इदिरा गांधी स्मृती रुग्णालयाचे व्यवस्थापन शासनाकडे घेण्याबाबत दिनांक 24 जुलै 2009 रोजी शासनाने घेतला असून या रुग्णालयासाठी 94 पदांच्या आकृती बंधानुसार महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचा-यांची नियुक्ती करण्याबाबत विकल्प देणा-या कर्मचा-यांची यादी सादर करणे, कर्मचा-यांच्या सामावेशनाची कार्यवाही शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने तीन महिन्यात करण्याबाबतच्या कार्यवाहीस विलंब होणे, शासन निर्णयानुसार स्व.श्रीमती इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयाचे व्यवस्थापन जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, ठाणे यांच्यामार्फत सार्वजनिक आरोग्य विभागाकडे 30 वर्षाकरिता हस्तांतरित करण्याचा निर्णय होऊन सुध्दा करार पत्र तयार करण्यास प्रशासनाकडून टाळाटाळ होत आहे. त्यामुळे सदर रुग्णालय त्वरित हस्तांतरित करण्यासाठी ही विशेष उल्लेखाची सूचना मी मांडत आहे. "

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : देवकी पुजारी या महिलेला कॅन्सर असल्याबाबत कल्याण येथील पॅथॉलॉजी लॅबने केलेले चुकीचे निदान

मु.शी. : देवकी पुजारी या महिलेला कॅन्सर असल्याबाबत कल्याण येथील पॅथॉलॉजी लॅबने केलेल्या चुकीच्या निदानाबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते :-

सभापती महोदय, नेरुळ, नवी मुंबई येथे राहणा-या देवकी पुजारी या महिलेच्या छातीजवळ गाठ असल्यामुळे त्या उपचारासाठी नेरुळ येथील हरिष हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्या होत्या. तेथे ऑगस्ट 2009 मध्ये त्यांच्यावर डॉ.शिशिर शेट्टी यांनी ऑपरेशन करुन ती गाठ काढली. सदरची गाठ कॅन्सरची असल्याच्या संशयावरुन पुढील तपासणीसाठी कल्याण मधील पॅथॉलॉजी लॅबमध्ये पाठविण्यात आली असतांना तेथील डॉ.अशोक शेख यांनी सदर महिलेस कॅन्सर असल्याचा अहवाल टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या कागदपत्रावर दिला होता , तो अहवाल खरा मानून देवकी पुजारी यांच्यावर केमोथेरपी उपचार सुरु केला गेला, खर्च परवडत नाही म्हणून सदर महिला केमोथेरपी उपचारासाठी टाटा मेमोरियलमध्ये दाखल झाली असून एकूण आठ वेळा केमोथेरपी उपचार झाल्यानंतर सदर महिलेस कॅन्सर नसून तो अहवाल खोटा असल्यासे उधडकीस आले उपचारासाठी महिलेला सुमारे पाच लाख रुपये खर्च आला असून त्यांना शारीरिक व मानसिक त्रास झाला आहे याबाबत जनमानसात वैद्यकीय व्यवस्थेविषयी चीड व अंसतोष निर्माण झाला आहे. कल्याण येथील पॅथॉलॉजी लॅबमध्ये खोटा अहवाल दिल्यामुळे या महिलेला चार वेळा केमोथेरपीचा उपचार घ्यावा लागला असून तिच्या शरीरावर त्याचा दुष्परिणाम झाला आहे .अशा पॅथॉलॉजीवर शासनाने कडक कारवाई करावी यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना मांडत आहे."

---

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हयात मायनिंगच्या नावाखाली वृक्षतोड केल्याने वनचर प्राण्यांचे अस्तित्व कमी होणे

**मु.शी.**: सिंधुदुर्ग जिल्हयात मायनिंगच्या नावाखाली वृक्षतोड केल्याने वनचर प्राण्यांचे अस्तित्व कमी होणे याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"हिंदुस्थानासह जगभरात व्याघ्र बचाव मोहिमेंतर्गत "प्रोजेक्ट टायगर" ही मोहिम चालू केली असून तिचे अध्यक्ष देशाचे माननीय पंतप्रधान आहेत. देशातील 1411 पटेरी वाघांपैकी 5 ते 6 पटेरी वाघ हे सिंधुदुर्ग जिल्हयात असून मायनिंगच्या नावाखाली वृक्षतोड केल्याने या वनचर प्राण्यांचे अस्तित्व कमी होत आहे. देशातील वाघ नामशेष होऊ नयेत यासाठी वन खात्याला आवश्यक त्या उपाय योजना करण्याचे आदेश देऊनही रत्नागिरी जिल्हयात 7 बिबटे मारले जाणे, संगमेश्वर येथे एका बिबटयांचा संशयास्पद मृत्यू होणे, याबाबत वनखात्याकडून कोणतीही कारवाई केल्याचे निदर्शनास आलेले नाही. बिबटयांना वाचविण्यासाठी देश पातळीवर कार्यवाही सुरु असूनही कोकणातील बिबटे, पटेरी वाघ व वनांचे संरक्षण करण्यासाठी मायनिंग प्रकल्प रद्द करण्याची गरज आहे."

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील निवडणूक कर्मचाऱ्यांना शासनसेवेत समाविष्ट करण्याचे आदेश निर्गमित न होणे

**मु.शी.**: राज्यातील निवडणूक कर्मचाऱ्यांना शासनसेवेत समाविष्ट करण्याचे आदेश निर्गमित न होणे याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील निवडणूक कर्मचाऱ्यांना पसंतीक्रमानुसार व वयोमर्यादेची अट शिथिल करुन शासन सेवेत सामावून घेण्याविषयी ऑगस्ट 2007 च्या सुमारास अंतिम मंजूरी मिळून देखील अद्यापपर्यंत शासनाने आदेश निर्गमित केलेले नाहीत. मार्च 2008 दरम्यान झालेल्या विधीमंडळ अधिवेशनात याबाबतीत निर्णय घ्यावयाचे विचाराधीन आहे असे सांगण्यात आले, तरी रोजंदारी तत्वावर नेमणूक झालेल्या निवडणूक कर्मचाऱ्यांच्या भविष्याच्या दृष्टीने महत्वाच्या बाबीकडे मी या विशेष उल्लेखाव्दारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो".

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: रोजगार हमी योजनेंतर्गत कुशल कामासाठी गोंदिया जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांनी निधीची मागणी करणे

**मु.शी.**: रोजगार हमी योजनेंतर्गत कुशल कामासाठी गोंदिया जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांनी निधीची मागणी करणे याबाबत श्री. केशवराव मानकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"रोजगार हमी योजनांतर्गत कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, गोंदिया यांनी 280.26 लक्ष रुपयांच्या कुशल कामासाठी निधीची मागणी करणे, सदर कामांपैकी रँडम पध्दतीने कामे निवडून त्याची तपासणी करुन त्याचा अहवाल पदसिध्द उपविकास आयुक्त (रोहयो), नागपूर यांनी त्यांचे पत्र क्र. रोहयो/सलेअ-1/कावि/243/09, दि.26.3.2009 अन्वये मा. सचिव (रोहयो) नियोजन विभाग, मुंबई यांचेकडे सादर करणे, तसेच पतमर्यादा मागणीसाठी सर्व तांत्रिक बाबी तपासून निधी मंजुरीची शिफारस सदर पत्रान्वये करण्यात येणे. तरीसुध्दा एक वर्षाचा कालावधी लोटूनही शासनाकडून निधीची मंजूरी प्राप्त न होणे, यामुळे गोंदिया जिल्हयातील रोजगार हमी योजनेंतर्गत कामे करणाऱ्या कंत्राटदारांमध्ये पसरलेला असंतोष लक्षात घेता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया".

सभापती महोदय, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद गोंदिया यांनी रोजगार हमी योजनेंतर्गत करावयाच्या कुशल कामांसाठी रुपये 280.26 लक्ष रुपयांच्या निधीची मागणी दिनांक 26.3.2009 रोजीच्या पत्रान्वये मा. सचिव, रोजगार हमी योजना, नियोजन विभाग यांचेकडे करुन एक वर्ष उलटून गेला तरी गोंदिया जिल्हयाला अजूनपर्यंत निधी प्राप्त झालेला नाही. त्यामुळे गोंदिया जिल्हयामध्ये काम करणाऱ्या कंत्राटदारांमध्ये असंतोष पसरलेला आहे. ही बाब लक्षात घेऊन शासनाने तातडीने 280.26 लक्ष रुपयांचा निधी गोंदिया जिल्हयाला वितरीत करण्यात यावा अशी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी विनंती करीत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मंत्रालय, व जिल्हा स्तरावरील विविध खात्यांमध्ये विधानसभा, विधानपरिषद सदस्यांनी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल न घेणे

**मु.शी.**: मंत्रालय, व जिल्हा स्तरावरील विविध खात्यांमध्ये विधानसभा, विधानपरिषद सदस्यांनी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल न घेणे याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मी व माझ्या सारखे सर्वच सदस्य (विधानसभा/विधान परिषद) मंत्रालयासह जिल्हा विभाग स्तरावरील विविध खात्यातील अधिकाऱ्यांशी लेखी पत्रव्यवहार करीत असतो. आमच्या पत्रावर केलेल्या कारवाईचा तपशील किंवा अहवाल देण्याची कोणत्याही प्रकारची दखल घेतली जात नाही. असा अनुभव आम्हा सर्व सदस्यांना कमी जास्त प्रमाणात सातत्याने येत आहे. या विशेष उल्लेखाव्दारे मी शासनास अशी विनंती करतो की, सामान्य प्रशासन विभागाने राज्यातील सर्वच अधिकाऱ्यांना लोकप्रतिनिधींनी सादर केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेऊन प्रश्नाच्या गुणवत्तेनुसार कालबध्द पध्दतीने निपटारा करणेबाबत आदेश व्हावेत. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांना मोबाईल केला असता मोबाईलसुध्दा उचलत नाहीत व परत फोनसुध्दा करीत नाहीत. शिवाय या कामी हलगर्जीपणा आढळून आल्यास त्यांचेवर कडक कारवाई करण्याबाबत योग्य ती उपाययोजना करावी. सदर विषय अति महत्वाच्या व सार्वजनिक हिताचा असल्याने तो मी आज सभागृहात "विशेष उल्लेखा"व्दारे उपस्थित करीत आहे".

---

अशुधारित प्रत/ प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्याच्या ग्रामीण भागातील शाळांमधील शौचालयांची झालेली दुरवस्था

**मु.शी.**: राज्याच्या ग्रामीण भागातील शाळांमधील शौचालयांची झालेली दुरवस्था याबाबत प्रा. सुरेश नवले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील ग्रामीण भागातील शाळांचा विकास व्हावा, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शाळांचा दर्जा सुस्थितीत राहण्यासाठी शासन कठोर अंमलबजावणी करीत असताना ग्रामीण भागातील बहुतांशी शाळांमधील शौचालयांचा वापर न करताच त्यांची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास येणे. उदा. मौजे काकडहिरा, तालुका बीड या गावासारख्या अनेक गावातील परिस्थिती याहीपेक्षा गंभीर आहे, ही बाब मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे, याची शासनाने कृपया नोंद घ्यावी."

---

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील ट्रेझरी ऑफीसरने आमदार निधीचे परत केलेले बिल.

**मु.शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील ट्रेझरी ऑफीसरने आमदार निधीचे परत केलेले बिल याबाबत श्री.जैनुद्दीन जव्हेरी वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"सभापती महोदय, मी विशेष उल्लेखाव्दारे आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, महाराष्ट्र शासनव्दारा वितरित आमदार निधी 31 मार्च 2000 पर्यंत खर्च करणे जरुरी आहे. पण चंद्रपूर जिल्ह्यातील ट्रेझरी ऑफीसर आमदार निधीतून वितरित संगणकीकरणाचे बिल परत करतात. आदरणीय श्री.नितीन गडकरी यांनी लोकमान्य टिळक विद्यालय यांना दिलेले संगणकाचे बिल रुपये 1 लाख 16 हजाराचे तसेच 15 फेब्रुवारी अगोदर सादर केले नाही. तसेच माझ्या आमदार निधीचे बिल परत केले. त्याबाबत मी प्रधान सचिव, वित्त विभाग यांच्याकडे तक्रार केली असता, त्याबाबत खुलासा मिळालेला नाही. तसेच चंद्रपूर, गडचिरोली जिल्हयातील नागरीक दलित निधी आतापर्यंत यु.डी.विभागामार्फत जिल्हाधिकारी यांना बी.डी.एस.मार्फत वितरीत होत नाहीत म्हणून वरील बाब गंभीर असून, शासनाने याची गंभीर दखल घ्यावी म्हणून विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाच्या नजरेस आणून देऊ इच्छितो."

---

. . . .2 सी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : गरीब अल्पसंख्यक अंशकालीक सेवकाला पूर्णवेळ सेवक म्हणून सामावून घेणे

मु.शी. : गरीब अल्पसंख्यक अंशकालीक सेवकाला पूर्णवेळ सेवक म्हणून सामावून घेणे याबाबत श्री पाशा पटेल, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, एका गरीब अल्पसंख्यक अंशकालीक सेवकाची व्यथा या विशेष उल्लेखाद्वारे आपल्या निदर्शनास आणीत आहे. दिनांक 25 फेब्रुवारी, 1970 पासून आजपर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपरी, ता. परळी वैजनाथ, जिल्हा बीड येथे पठाण हुसैन खाँ हबीब खाँ हा अंशकालीक सेवक म्हणून काम करीत आहे. त्याच्या सोबतच्या अनेक जणांना पूर्णवेळ सेवक म्हणून सामावून घेण्यात आलेले आहे. पठाण हुसैन खाँ हबीब खॉ यांनी दिनांक 2 मे, 1990 च्या शासन निर्णयासह वेळोवेळी जिल्हापरिषद, बीड कडे अनेक अर्ज सादर केलेले आहेत. तरी सुध्दा प्रति माह रु. 30/- मानधनावर त्यांना राबवून घेण्यात येत आहे. आपल्या पुरोगामी महाराष्ट्र राज्यात एवढा अन्याय एखाद्या गरीब अल्पसंख्यक व्यक्तीला का सहन करावा लागतो हे मला न उलगडलेले कोडें आहे. आपण या गरीबाला न्याय द्यावा म्हणून विशेष उल्लेखाद्वारे त्याची व्यथा आपल्यासमोर मांडत आहे. आपण उदार अंत:करणाने त्याला न्याय द्यावा."

---

. . . .2 सी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : वन विभागात रोजंदारीवरील कामगारांना सेवानिवृत्ती वेतन देणे.

मु.शी. : वन विभागात रोजंदारीवरील कामगारांना सेवानिवृत्ती वेतन देणे याबाबत श्री. भगवान साळुंखे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून एका मुद्याकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. गेल्या 25 ते 30 वर्षापासून वन विभागात नोकरी करुन सेवानिवृत्त झालेले शेकडो कामगारांवर आता उपासमारीची वेळ आलेली आहे. कारण त्यांना सेवानिवृत्ती वेतनच मिळत नाही. वन खात्यात रोजंदारीवर काम करणारे हे कर्मचारी आता वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांनी न्यायालयात धाव घेतली आहे. माननीय न्यायालयाने या कर्मचाऱ्यांच्या बाजूने निर्णय दिला आहे. तरीही शासनाने अद्याप या वन खात्यातील कर्मचाऱ्यांना न्याय दिलेला नाही. आता ही मंडळी आझाद मैदानावर आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत. त्यांना सेवानिवृत्ती वेतन देऊन दिलासा द्यावा, अशी मी यानिमित्ताने शासनाला नम्र विनंती करतो.

---

. . . .2 सी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : दि.20 जुलै 2009 च्या शासन आदेशाप्रमाणे "कायम"शब्द काढून उच्च माध्यमिक शिक्षकांना न्याय देणे

**मु. शी.** : दि.20 जुलै 2009 च्या शासन आदेशाप्रमाणे "कायम"शब्द काढून उच्च माध्यमिक शिक्षकांना न्याय देणे याबाबत श्री.भगवान साळुंखे वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□य सदस्य श्री.भगवान साळुंखे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, गुरुवार, दिनांक 25 मार्च, 2010 पासून राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयीन म्हणजेच उच्च माध्यमिक शिक्षकवर्ग दिनांक 20 जुलै, 2009 च्या शासन आदेशाप्रमाणे 'कायम' शब्द काढून उच्च माध्यमिक शिक्षकांनाही न्याय द्यावा, या मागणीसाठी त्यांचे आझाद मैदानावर आमरण उपोषण सुरु आहे. शासनाने या संघटनेच्या भावना समजावून घेऊन त्यांना ही न्याय झावा, अशी मी विनंती करतो.

---

. . . .2 सी-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटीलसाहेबांनी जो विशेष उल्लेख मांडलेला आहे, त्यासंबंधात मला फक्त एकच मिनिट बोलावयाचे आहे.

सभापती महोदय, आम्ही अनेक विभागांना म्हणजे उदाहरण द्यावयाचे तर सार्वजनिक आरोग्य विभागाला, वैद्यकीय शिक्षण विभागाला, आदिवासी विकास विभागाला पत्रे लिहीत असतो. पण त्या पत्रांची उत्तरे मिळत नाही. तीन-तीन महिने झाले तरी त्या पत्रांची साधी पोच मिळत नाही. या बाबतीत विभागाच्या सचिवांना जाऊन भेटल्यानंतर ते असे सांगतात की, आम्ही आपल्या घरी पत्र पाठवितो. पण आजही पत्रे मिळत नाहीत. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी जो विशेष उल्लेख मांडलेला आहे, त्याबाबतीत आपण काहीतरी कडक निर्देश द्यावेत अशी विनंती करतो.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : सभापती महोदय, हे नियम समितीकडे सोपविलेले आहे.

**उपसभापती** : आता यावर चर्चा होणार नाही. मी निर्देश देतो आणि ते आपल्या माहितीसाठी आपल्या घरी रवाना करतो.

---

. . . .2 सी-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी.** : सन 2010-2011 या शैक्षणिक वर्षापासून खाजगी शाळेतील शिक्षकांनाही तालुका व जिल्हास्तरावरचे

आदर्श शिक्षक पुरस्कार देणे.

**मु. शी.** : सन 2010-2011 या शैक्षणिक वर्षापासून खाजगी शाळेतील शिक्षकांनाही तालुका व जिल्हास्तरावरचे आदर्श शिक्षक पुरस्कार देणे याबाबत श्री.विक्रम काळे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री.विक्रम काळे यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

"शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो पिणार तो गुरगुरल्याशिवाय रहाणार नाही. हा महत्वाचा संदेश शिक्षणाचे महत्व पटवून सांगताना महापुरुष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिला आहे.

"विद्येविना मति गेली, मतीविना नीती गेली
नीतीविना गती गेली, गतीविना वित्त गेले,
वित्तविना शुद्र खचले, इतके अनर्थ अविद्येने केले.

हा संदेश थोर समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांनी शिक्षणाचे महत्व पटवून देतांना दिला आहे. शिक्षणामुळेच जीवनात क्रांती होऊ शकते आणि म्हणून असे शिक्षण देण्याचे महत्वाचे काम शिक्षक करीत असतात. महाराष्ट्र राज्य हे शाहु,फुले,आंबेडकर यांच्या विचारांचे पुरोगामी राज्य आहे.समाजात शिक्षकास मानाचे स्थान आहे.पुर्वीपासूनच गुरुजींना उच्च दर्जा दिलेला आहे. शिक्षकांना प्रोत्साहन मिळावे म्हणून शासनाच्यावतीने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. जिल्हास्तरावर, तालुका स्तरावर जिल्हा परिषदेच्या शाळातील शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जात आहे.परंतु खाजगी शाळांतील शिक्षकांवर मात्र अन्याय होत आहे. कारण तालुका व जिल्हास्तर खाजगी शाळेतील शिक्षकांना आदर्श पुरस्कार दिला जात नाही. हा भेदभाव का करण्यात येतो हेच कळत नाही. तेव्हा सन 2010-2011 या शैक्षणिक वर्षापासून .....

. . . .2सी-7



श्री.विक्रम काळे . . . .

खाजगी शाळेतील शिक्षकांना सुध्दा जिल्हा परिषद शिक्षकांप्रमाणे तालुका व जिल्हास्तरावर आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात यावेत अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे मांडीत आहे." धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आणि श्री. भगवान साळुंखे यांनी याठिकाणी विशेष उल्लेखाद्वारे त्याचे विचार मांडले आहेत. याबाबतीत एक गोष्ट नक्की आहे की, या ठिकाणी जे विशेष उल्लेख सादर केले जातात, सभागृहापुढे आणले जातात त्याची योग्य ती दखल राज्य शासनाच्या संबंधित विभागाने घेऊन किमान त्यांना उत्तर देण्याचे सौजन्य तरी दाखवावे. एवढीही सौजन्यशीलता महाराष्ट्र शासनाच्या अधिकाऱ्यांमध्ये राहिलेली नाही, असे मला वाटत नाही. सौजन्यशील असे अधिकारी आपल्याकडे असताना, जर असे काही होत असेल तर ते खेदजनक आहे. कृपया आपण याची गंभीर नोंद घ्यावी. सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना तसेच त्यांनी काही निवेदने पाठविली असतील तर त्याला देखील पध्दतशीररीत्या उत्तर देण्याची कारवाई यापुढे व्यवस्थितपणे पार पाडावी.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आपण दिलेल्या सूचनेची निश्चितप्रकारे गंभीरपणे नोंद घेतली जाईल.

**उपसभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेले विधेयक उद्या घ्यावयाचे काय?

श्री. दिवाकर रावते : ठीक आहे.

**उपसभापती** : सभागृहाची बैठक 2.00 वाजेपर्यंत स्थगित होत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.26 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगितीनंतर )

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: सन 2010-2011 चा अर्थसंकल्प सादर करणे

श्री. विजय वडेट्टीवार ( वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी सन 2010-2011 चा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे.

( यानंतर माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले )

( प्रेस : येथे सोबत जोडलेले अर्थसंकल्पीय भाषण (भाग पहिला) छापावे )

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पाचे वाचन केले.....

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय वित्त राज्यमंत्री यांचे अर्थसंकल्पीय भाषण पुढे सुरु.....

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

25-03-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) KK

VTG/ KGS/ KTG/ ST/

14:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले )

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पाचे वाचन केले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 15:05

माननीय वित्त राज्यमंत्री यांचे अर्थसंकल्पीय भाषण पुढे सुरु.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय वडेट्टीवार.....

आता मी अर्थसंकल्पाच्या दुस-या भागाचे वाचन करण्यापूर्वी दोन कविता ऐकवितो.

मानवता ही पंथ मेरा, इंसानियत है पक्ष मेरा
सबकी भलाई धर्म मेरा, दुविधा को हटाना वर्म मेरा
एक जात बनाना कर्म मेरा, सब साथ चलाना मर्म मेरा
नीच-ऊँच हटाना गर्व मेरा, गिरते को उठाना स्वर्ग मेरा.

उंची न आपूली वाढते, फारशी वाटून हेवा
श्रेय ज्याचे त्यास द्यावे, एवढे लक्षात ठेवा

(प्रेस : येथे सोबत जोडलेले अर्थसंकल्पीय भाषण (भाग दुसरा) छापावे.)

यानंतर VV-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय वडेट्टीवार....

"असहाय दुखिताना, आनंद देत जावे ।
आनंद देत असता, आनंद घेत जावे ॥

**सभापती** : सन 2010-2011 चा अर्थसंकल्प सभागृहास सादर करण्यात आला.

अर्थसंकल्पीय प्रकाशने सुटकेससह सन्माननीय सदस्यांना देण्याची व्यवस्था वित्त विभागातर्फे तळ मजल्यावरील वितरण केंद्रावर करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी वितरण केंद्रावरुन सदर प्रकाशने घ्यावीत.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 26.3.2010 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक उपारी 3 वाजून 26 मिनिटांनी, शुक्रवार,
दिनांक 26.3.2010 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

*******

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही